विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली पुरस्कृत

# दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

## विषय : 'मराठी वाङ्मयीन चळवळी : बदलते संदर्भ'

गुरुवार दि. २३ व शुक्रवार दि. २४ डिसेंबर २०१०



आयोजक

ताराराणी विद्यापीठाचे

# कमला कॉलेज, कोल्हापूर

(नॅक मानांकित B +)

# स्मरणिका

प्रकाशक : प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील



मा. कै. डॉ. व्ही. टी. पाटील

तथा काकाजी



मा. कै. सौ. सरोजिनीदेवी पाटील

तथा काकीजी

# ताराराणी विद्यापीठाविषयी माहिती

- महाराष्ट्रातील सन १९४५ पासून स्त्री शिक्षणाच्या पवित्र कार्याला वाहून घेतलेली कोल्हापूर शहरातील एकमेव अग्रगणी स्त्री शिक्षण संस्था. डॉ. कै. व्ही. टी. पाटील यांनी या संस्थेची स्थापना केली.
- हे विद्यापीठ म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज यांची स्नुषा छत्रपती ताराराणी हिच्या पराक्रमाला साजेसे एक स्मारक होय.
- विद्यापीठाच्या प्रांगणामध्ये असलेला महाराणी ताराराणींचा भव्य अश्वारूढ पुतळा, राजेशाही दिमाखातील शिव मंदिर, निसर्ग सौंदर्याची भूरळ पाडणारे 'माधवराव बागल आर्ट गॅलरी' प्रशस्त आणि चित्ताकर्षक शारदा मंदिर ही या विद्यापीठाची सौंदर्य स्थळे आहेत.
- संपन्न शैक्षणिक वारसा लाभलेली व सध्या जवळजवळ ६,००० विद्यार्थिनी वेगवेगळ्या शिक्षण शाखात ज्ञानार्जन करीत आहेत. या विद्यापीठाचा शाखा विस्तार पुढील प्रमाणे – प्रिन्स शिवाजी विद्यालय, उषाराजे हायस्कूल, डी.एड. कॉलेज, कमला ज्युनिअर व सिनिअर, जुनी आणि नवी हॉस्टेल बिल्डींग ज्यामध्ये ३०० विद्यार्थिनींची सोय, हेल्थ क्लब, बँकिंगची सेवा एका छत्राखाली.

**महाराणी ताराराणींची कीर्ती आणि स्मरण नित्य होण्यासाठी संस्था पुढील उपक्रम राबवित आहे.**

- **भद्रकाली ताराराणी पुरस्कार :** भारतीय पातळीवर शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, क्रीडा, प्रशासकीय इत्यादी क्षेत्रांमध्ये असामान्य कर्तृत्व गाजविणाऱ्या महिलेस हा सन्मान बहाल करण्यात येतो.
- ताराराणींचे कर्तृत्व विद्यापीठ पातळीवरील विद्यार्थ्यांना समजावे म्हणून शिवाजी विद्यापीठास विनंती करून **'ताराराणी व्याख्यानमाला'** सुरु केली.
- संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. डॉ. व्ही.टी. पाटील तथा काकाजी यांनी नाटककार वसंत कानेटकरांना नाटक लिहावे अशी विनंती केली व त्यानुसार ताराराणींच्या पराक्रमांचे दर्शन घडविणाऱ्या **'जिथे गवतास भाले फुटतात'** या नाटकाची निर्मिती झाली.
- ज्येष्ठ सिने दिग्दर्शक, पटकथा लेखक, निर्माते श्री. दिनकर द. पाटील यांना विनंती करून **'शिवरायांची सून ताराराणी'** या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली.

विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली पुरस्कृत दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

# 'मराठी वाङ्मयीन चळवळी : बदलते संदर्भ'

## गुरूवार दि. २३ व २४ डिसेंबर २०१०


* **प्रकाशक :**

**डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील**
प्राचार्य,
कमला कॉलेज, कोल्हापूर
महाराष्ट्र - ४१६ ००८.

* **संपादक :**

**प्रा. सुजय बा. पाटील** (समन्वयक)
**प्रा. डॉ. जे. बी. पाटील** (समिती सदस्य)

* **प्रकाशन स्थळ :**

**श्री. शरद गोसावी**
राजहंस प्रिंटींग प्रेस
नागाळा पार्क, कोल्हापूर.
फोन : ०२३१ - २६६४६३०


© **सर्व हक्क सुरक्षित.**

## अनुक्रमणिका


| | | पान नं. |
|---|---|---|
| ❑ | प्रस्तावना | १ |
| ❑ | अहवाल | २-३ |
| ❑ | बीजभाषण | ४-७ |
| ❑ | वाङ्‌मयीन चळवळीचे साहित्यशास्त्र<br>**डॉ. वासुदेव सावंत**<br>मराठी विभाग प्रमुख, गोवा विद्यापीठ, गोवा | ८-९ |
| ❑ | स्त्रीविषयक चळवळ आणि मराठी नियतकालिके<br>**डॉ. सुनीता लेंगडे**<br>घोडावत महाविद्यालय, जयसिंगपूर. | १० |
| ❑ | दलित साहित्य व चळवळीचे बदलते संदर्भ : प्रेरणा व प्रवृत्ती<br>**प्रा. आनंद साठे**<br>मराठी विभाग प्रमुख, कला व वाणिज्य महाविद्यालय मेढा, ता. जावली, जि. सातारा | ११-१२ |
| ❑ | 'भटक्या विमुक्तांची वाङ्‌मयीन चळवळ'<br>**डॉ. गिरीश मोरे**<br>राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय, रूकडी | १३ |
| ❑ | 'फुले आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य'<br>**प्रा. सौ. शीला रत्नाकर**<br>मराठी विभागप्रमुख, यशवंतराव चव्हाण कला व वाणिज्य महाविद्यालय, इस्लामपूर | १४ |
| ❑ | 'दलित साहित्य चळवळीचे बदलते संदर्भ'<br>**डॉ. सौ. सविता अशोक व्हटकर**<br>अधिव्याख्याती, मराठी विभाग, भोगावती महाविद्यालय, कुरूकली, ता. करवीर, जि. कोल्हापूर. | १५ |
| ❑ | दलित साहित्याची चळवळ : बदलते संदर्भ<br>**प्रा. सतीश कामत**<br>कला व वाणिज्य महाविद्यालय, फोंडाघाट, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग | १६-१७ |
| ❑ | ''आदिवासी साहित्य चळवळ : बदलते संदर्भ ''<br>**प्रा. कैलास महाले** | १८ |
| ❑ | शेतकरी चळवळ<br>**शोधनिबंधवाचक - प्रा. लक्ष्मण स. शिंदे**<br>आर्टस सायन्स व कॉमर्स कॉलज, रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली. मराठी विभाग - आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स, रामानंद नगर (बुर्ली) | १९-२१ |
| ❑ | 'स्त्रीवादी साहित्य चळवळ'<br>**प्रा. उर्मिला आ. पाटील**<br>**प्रा. सुजय बा. पाटील**<br>कमला कॉलेज, कोल्हापूर | २२-२४ |
| ❑ | आयोजन समिती | २५-२६ |
| ❑ | कार्यक्रम पत्रिका | २७-३० |
| ❑ | चर्चासत्राविषयी प्रतिक्रिया | ३१ |
| ❑ | प्रमाणपत्र | ३२ |

# प्रस्तावना

कोणत्याही भाषेतील साहित्य हे समाजाच्या जीवनातून निर्माण होणाऱ्या विविध प्रवाहांच्यामुळेच अधिक संपन्न होत असते. मराठी भाषा देखील त्याला अपवाद नाही. त्यामुळेच संत साहित्य, ग्रामीण, दलित, आदिवासी, ख्रिस्ती, मुस्लिम, स्त्रीवादी, अनियतकालिक ग्रंथ चळवळ, शेतकरी चळवळ इत्यादी सामाजिक व वाङ्मयी चळवळींनी बदलत्या संदर्भात विपुल लेखन करून मराठी साहित्य समृद्ध व संपन्न करण्याचा प्रयत्न केला आहे. पण या वाङ्मयीन चळवळी ज्या उद्देशातून पुढे आल्या तो उद्देश सफल झाला का ? या दृष्टिकोणातून विचार होणे गरजेचे वाटते. या उद्देशातूनच आम्ही **'मराठी वाङ्मयीन चळवळी : बदलते संदर्भ'** या विषयावरील राष्ट्रीय पातळीवरच्या चर्चासत्राचे आयोजन केले होते.

या चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी वेगवेगळ्या माध्यमातून आम्हाला अनेकांचे सहकार्य लाभले. त्यांचे आभार व्यक्त करणे हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो. चर्चासत्रास बीजभाषक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद चे माजी कुलगुरु व ज्येष्ठ साहित्यिक **मा. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले** लाभले. तर उद्घाटक म्हणून शिवाजी विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू **मा. डॉ. ना. ज. पवार** उपस्थित राहिले. तसेच अध्यक्ष म्हणून शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरु **मा. रा. कृ. कणबरकर** यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचबरोबर विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांचे अर्थसहाय्य, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ यांचा बौद्धिक सहयोग आम्हाला लाभला. त्याचबरोबर विविध विद्यापीठातील प्राध्यापकांनी उपस्थित राहून संदर्भ मूल्य असणारे पेपर सादर केले व चर्चासत्राची वाटचाल यशस्वी झाली याबद्दल मी सर्वांचा ऋणी आहे.

प्राचार्य

**डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील**

### विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली पुरस्कृत दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

# 'मराठी वाङ्मयीन चळवळी : बदलते संदर्भ'

## गुरूवार दि. २३ व २४ डिसेंबर २०१०

मराठी साहित्यामध्ये समृद्धतेच्या दृष्टीने जे विविध प्रवाह निर्माण झाले त्याचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने सदर राष्ट्रीय पातळीवरील चर्चासत्राचे आयोजन आम्ही केले होते. आमच्या या चर्चासत्राची माहिती संबंधित शिक्षणसंस्था, विद्यापीठे, प्राध्यापक, भाषेचे अभ्यासक, विद्यार्थी यांना होण्यासाठी त्याची पूर्व माहिती विविध वर्तमानपत्रातून, आकाशवाणी केंद्र कोल्हापूर, सह्याद्री वाहिनी या जनसंपर्क माध्यमांच्याद्वारे पोहोचविण्याचा प्रयत्न केला. तसेच एक महिना आधी भारतातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालये यांना निमंत्रण पत्रिका पाठविल्या. त्यामुळेच महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा या राज्यातून ११० प्रतिनिधी चर्चासत्रास उपस्थित राहू शकले.

## चर्चासत्राचा पहिला दिवस : गुरुवार दि. २३/१२/२०१०

चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभा प्रसंगी बीजभाषक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादचे माजी कुलगुरु व ज्येष्ठ साहित्यिक **मा. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले** लाभले. तर उद्घाटक म्हणून शिवाजी विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू **मा. डॉ. ना. ज. पवार** उपस्थित राहिले. तसेच अध्यक्ष म्हणून शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरु **मा. रा. कृ. कणबरकर** यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ताराराणी विद्यापीठाचे सचिव व कमला कॉलेजचे **प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील** यांनी केले.

उद्घाटनानंतर **'महाराष्ट्रातील प्रबोधनाच्या चळवळी'** या शीर्षकाचे सत्र पहिले दुपारी १२.०० ते २.०० या वेळेत संपन्न झाले. या सत्रात साधन व्यक्ती म्हणून **मा. प्रसाद कुलकर्णी** – सदस्य समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, **डॉ. अच्युत माने** – विचारवंत **(निपाणी, कर्नाटक)** यांनी विचार मांडले. तर सत्राध्यक्ष म्हणून **डॉ. ल. रा. नसिराबादकर** – माजी मराठी विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व सुसंवादक म्हणून **डॉ. संपत पार्लेकर** – सांगली यांनी काम पाहिले.

त्यानंतर **'साहित्य आणि चळवळ यांचा अनुबंध'** या शीर्षकाचे सत्र दुसरे दुपारी २.३० ते ४.०० या वेळेत संपन्न झाले. या सत्रात साधन व्यक्ती म्हणून **मा. संतोष शेणई** – अनियतकालिकांची चळवळ (लेखक सहसंपादक, दै. सकाळ, पुणे), **प्रा. गौतमीपुत्र कांबळे** – (फुले, आंबेडकरी चळवळ आणि साहित्य यांचा अनुबंध) यांनी विचार मांडले. तर सत्राध्यक्ष म्हणून **डॉ. डी. ए. देसाई** – माजी अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व सुसंवादक म्हणून **डॉ. प्रकाश कुंभार** यांनी काम पाहिले.

**'चळवळीतील लेखक'** या शीर्षकाचे सत्र तिसरे दुपारी ४.०० ते सायं. ६.०० या वेळेत संपन्न झाले. या सत्रात साधन व्यक्ती म्हणून **डॉ. रवींद्र ठाकूर** – ग्रामीण साहित्याची चळवळ (मराठी विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर), **श्री.**

**रामनाथ चव्हाण** – भटक्या विमुक्तांचे साहित्य व चळवळ (प्रमुख अण्णाभाऊ साठे अध्यासन पुणे विद्यापीठ, पुणे), **डॉ. सुनीलकुमार लवटे** – वंचितांचे साहित्य व चळवळ (सदस्य : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ), **डॉ. हिमांशु स्मार्त** – मराठी नाट्य साहित्याची चळवळ (मराठी विभाग शिवाजी विद्यापीठ), यांनी विचार मांडले. तर सत्राध्यक्ष म्हणून **प्रा. भैरव कुंभार** – (माजी अध्यक्ष मराठी अभ्यास मंडळ, शिवाजी विद्यापीठ) व सुसंवादक म्हणून **डॉ. जे. बी. शिंदे** यांनी काम पाहिले. याबरोबरच पहिल्या दिवसाच्या चर्चासत्राच्या कामकाज संपन्न झाले.

## चर्चासत्राचा दुसरा दिवस : शुक्रवार दि. २४/१२/२०१०

**'विविध साहित्य प्रकार व चळवळी' – निबंध वाचन** या शीर्षकाचे सत्र चौथे सकाळी ९.३० ते १२.३० या वेळेत संपन्न झाले. या सत्रात सत्राध्यक्ष म्हणून **प्राचार्य डॉ. जी. पी. माळी** – माजी सदस्य, मराठी अभ्यास मंडळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व सुसंवादक म्हणून **डॉ. ब. ना. तुरंबेकर** (संत साहित्याचे संशोधक) यांनी काम पाहिले. या प्रसंगी चर्चासत्रातील सहभागी प्राध्यापकांच्या विविध विषयांवरील निबंध वाचन व त्यावरील चर्चा संपन्न झाली.

**'चळवळीचे साहित्य शास्त्र'** या शीर्षकाचे सत्र पाचवे दुपारी २.०० ते ३.०० या वेळेत संपन्न झाले. या सत्रात साधन व्यक्ती म्हणून **डॉ. वासुदेव सावंत** – मराठी विभाग प्रमुख, गोवा विद्यापीठ, गोवा, यांनी विचार मांडले. तर सत्राध्यक्ष म्हणून **डॉ. विश्वनाथ शिंदे** – (मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ) व सुसंवादक म्हणून **डॉ. छाया पवार** यांनी काम पाहिले.

यानंतर **'समारोपा'** चे सत्र सहावे दुपारी ३.०० ते ४.०० या वेळेत संपन्न झाले. यावेळी समारोपाच्या सत्राचे प्रमुख पाहुणे म्हणून **मा. श्रीराम पवार** – संपादक, दै. सकाळ, कोल्हापूर, उपस्थित होते. तर अध्यक्ष म्हणून राष्ट्रीय पातळीवरील ज्येष्ठ विचारवंत **कॉ. गोविंद पानसरे** उपस्थित होते.

अशाप्रकारे दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचा समारोप झाला. या निमित्ताने मराठी साहित्याचे संगोपन, संवर्धन या दृष्टिकोणातून अभ्यासपूर्ण चर्चा झाली. शोध निबंधांचे सादरीकरण झाले. हे चर्चासत्र आयोजित करण्यामागील आमचा हेतू संपन्न झाला, असे आम्हास वाटते.

समन्वयक

**प्रा. सुजय बा. पाटील**

## बीजभाषक : डॉ. नागनाथ कोत्तापल्ले (ज्येष्ठ साहित्यिक व माजी कुलगुरू डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद)

साहित्याचे क्षेत्र ही रणभूमी असून, तिच्या वाङ्मयीन चळवळीचे समाजाशी नाते असते. वाङ्मयीन चळवळी या भूमिका मांडण्यासाठी निर्माण होतात. प्रत्येक वाङ्मयीन साहित्याचे सौंदर्यशास्त्र वेगळे असत नाही. प्रस्थापितांचे सौंदर्यशास्त्र बंडखोरांना मान्य असेलच असे नाही. प्रस्थापित व्यवस्था ही गुंतागुंतीची असून ती मानवी व्यवहारातून ध्वनीत होते. व्यवस्थेतील फायदे फारच थोड्या लोकांना मिळतात असे लोक शब्दांचा भुलभुलेय्या कराण्यात पटाईत असतात. आधुनिकतेने नवीन मूल्य दिली आहेत. माणूस व धर्म यांच्यात सीमारेषा आखण्याचे काम आधुनिकतेमध्ये झाले आहे. त्यांपेक्षा आधुनिकता व स्वातंत्र्याच्या चळवळीने अन्य चळवळींना गर्भाशय पुरविले आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सद्य:स्थितीत वाङ्मयीन चळवळींनी चांगल्या समाजजीवनाचा आग्रह धरावा.

## उद्घाटक : डॉ. ना. ज. पवार (मा. कुलगुरू शिवाजी विद्यापीठ)

भाषा आणि त्यातून निर्माण होणारे साहित्य हे तत्कालीन मानव व मानव जीवनाची सुरुवात ही भाषेशी निगडीत आहे. १२ व्या शतकाचा विचार करावयाचा म्हटले तर, साहित्याचा प्रभाव व्यक्ती आणि समाजावर होता. साहित्यामध्ये मोठी ताकद असते. ती नवसमाज निर्मितीसाठी वापरली जाते. मध्ययुगीन काळात असणाऱ्या भाषा आणि सद्यःपरिस्थितीमध्ये मोठा फरक निर्माण झाला आहे. भाषा हा संशोधनाच्या विषय आहे. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी बदलते संदर्भ व प्रवाह हाच संशोधनाचा विषय असावा

पैसा हे भांडवलात राहील अस नाही पण आपलं ज्ञान हे आपलं भांडवल राहील. म्हणून भाषेला आपण प्रवाहात आणलं पाहिजे. सरस्वती आणि लक्ष्मी एकत्र नांदल्या म्हणजे आर्थिक सुबत्ता व ज्ञानप्राप्ती होते. जागतिकीकरणात, अर्थकरण बदल घडून येत असतानाच यातून समाज निर्माण होत असतो. नवसाहित्य निर्मितीसाठी हे एक आव्हान आहे. भाषेचे संवर्धन, भाषेचे संशोधन हेच समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे.

## अध्यक्षीय मनोगत : मा. रा. कृ. कणबरकर (मा. कुलगुरू शिवाजी विद्यापीठ)

साहित्य हे समाजापासून अलिप्त राहून हस्तिदंती मनोऱ्यात बसून तयार केलेली कला नव्हे. तर तिचा साहित्याशी घनिष्ठ संबंध आहे. समाज बदलासाठी या चळवळीची नोंद साहित्यिकाने घ्यावी लागते. शांततेच्या काळात अहिंसक पद्धतीने लढल्या गेलेल्या लढाया अधिक टिकाऊ असतात. समाजात व व्यवहारात बदल घडवायची ताकद भाषेत आहे. भाषा ही आपल्या शिक्षणाचे माध्यम आहे, ज्ञानभाषा बनते आहे. जागतिकीकरणाचा परिणाम भाषेवर झाला. लोकांच्या भाषेसंबंधी चळवळ उभारणे आवश्यक आहे. भाषा विचाराचे व अभिव्यक्तीचे साधन आहे. साहित्यातून आनंद मिळतो. भाषा हे जून, गंजलेले साधन आपण उपयुक्त केले पाहिजे. मराठी माध्यमाविषयी गैरसमज निर्माण झाले आहेत ते पुनर्प्रस्थापित कसे होईल यासाठी चळवळी करणे आवश्यक आहे.

## डॉ. क्रांतिकुमार पाटील (प्राचार्य कमला कॉलेज, कोल्हापूर व सचिव, ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर)

कोल्हापूर हे शाहू महाराजांच्या प्रगतिशील विचारांनी पुढारलेली नगरी म्हणून ओळखली जाते. महात्मा फुले, सावीत्रीबाई फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या शैक्षणिक विचारांचा वारसा या नगरीने जपलेला आहे. त्यामुळेच येथे शिक्षणाची चळवळ मोठ्याप्रमाणात उभी राहिली.

भाषेच्या बाबतीत विचार करायचा झाला तर, ज्या भाषेमध्ये तिच्या इतिहासाबरोबरच वर्तमानातील बदलांचा प्रवाहांचा समावेश केला जातो तीच भाषा जीवंत राहते. मराठी भाषेच्या बाबतीत बघितले तर महानुभाव संप्रदाय, वारकरी संप्रदाय अशी प्राचीन परंपरा असणाऱ्या या भाषेमध्ये पुढे ग्रामीण, दलित, आदिवासी, ख्रिस्ती, मुस्लीम, स्त्रीवादी, अनियतकालिक ग्रंथ चळवळ, शेतकरी चळवळ इत्यादी वाङ्मयीन प्रवाह निर्माण झाले. त्यानुसार विपुल लेखन झाले व परिणामी मराठी भाषा समृद्ध होत गेली. तरी देखील बदलणाऱ्या काळाची आव्हाने पेलण्यासाठी तिच्यात सामर्थ्य येण्यासाठी अशा चर्चासत्रांची गरज नाकारता येणार नाही.

## मा. प्रसाद कुलकर्णी (सदस्य समाजवादी प्रबोधिनी)

प्रथम युरोपमध्ये प्रबोधनाची चळवळ सुरू झाली. समाजजीवनातील सर्व भागात प्रबोधनाची गरज आहे. भारतात प्रबोधनाची सुरुवात व्हायला वेळ लागला. डॉ. राजाराम मोहनरॉय यांनी भारतात प्रबोधनाची सुरुवात केली आहे. चार्वाक, बौद्ध, गुरुगोविंद इत्यादी सकारात्मक सृजनशील विचारांचे देणे दिले – प्रबोधन या शब्दांची ओळख इतिहासापासून जाणून घेण्याची गरज आहे. तत्त्वज्ञानाची बैठक सगळ्या क्षेत्राला हवी; तत्त्व शिवाय अराजकता माजेल, तत्त्वज्ञान हेच साहित्याचा अंतिम जीवनाचे सत्य आहे. 'End of History' प्रबोधन चळवळीस मारक गोष्ट आहे.

## डॉ. अच्युत माने (विचारवंत, कर्नाटक)

मूल्यात्मक जाणीव मानव विसरत गेला की समाजामध्ये सांस्कृतिक मांद्य निर्माण होते; साहित्यिक अराजक हे सांस्कृतिक अराजकतेला कारणीभूत आहे. 'व्यक्तिवाद' फोफावला आणि सामाजिकता कमी झाली. पोटाला भाकरी देणारा माणूस, डोक्याला ज्ञान देणारा माणूस अशा माणसांच्या २ जाती आहेत असे कार्लाईक म्हणतो. ज्ञान आणि श्रमाची सांगड घालणे गरजेचे आहे, ज्या शिक्षणाला सामाजिक मूल्य नाही ते काय कामाचे. आवाज उठवणारा कंठ आज दिसेना तो या समाज व्यवस्थेत दाबून धरलेला आहे. आजाची कुटुंबव्यवस्था आणि नातेसंबंध यांचे चित्रण साहित्यात व्हायला हवे.

## डॉ. ल. रा. नसिराबादकर (माजी मराठी विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.)

प्रबोधन म्हणजे आत्मिक, सामाजिक, मानवी, उन्मयत होय. संत तुकाराम, म. फुले यांनी प्रबोधनाचे कार्य केले. प्रपंच हे रणांगण आहे, असे तुकाराम महाराज सांगत. जसे विचारवंत तसा समाज, रखरखणारे, बोचणारे प्रखर वास्तव म्हणजे सौंदर्यवाद हे कलाकृतीत यावे. दाहक वास्तवतेचे चित्रण काचेच्या घरात बसणारे लोक करू शकत नाही.

## संतोष शेणई (लेखक सहसंपादक, दै. सकाळ, पुणे)

चळवळीच्या प्रेरणा या सामाजिक आणि राजकीय आहेत. मराठी साहित्यावर मर्ढेकरांचा प्रभाव होता. त्यावेळचे बदलते सामाजिकीकरण लघुनियत कालिकात येत होते. १९७४ नंतरच्या नियतकालिकांच्या प्रेरणा वेगळ्या आहेत. १९६० नंतरच्या चळवळीच्या प्रेरणा सांस्कृतिकतेतून आल्या आहेत. या पिढीला व्यासपीठ नसल्याने अनियतकालिकाचे व्यासपीठ तयार झाले.

## प्रा. गौतमीपुत्र कांबळे (फुले आंबेडकरी चळवळ आणि साहित्य यांचे अभ्यासक)

विचारांशिवाय चळवळ होऊ शकत नाही. विचार हाच चळवळीचा पाया आहे, चळवळ ही संघटनात्मक असते, तिला हेतू असतो. विचार रुजविण्याचे, सातत्य राखण्याचे कार्य करणे म्हणजे चळवळी होय. कोणत्याही चळवळीला पार्श्वभूमी असते, तत्त्वज्ञान, भूमिका, माध्यम, निर्मिती प्रक्रिया, प्रेरणा, फलश्रुती ही चळवळींची जबाबदारी असते. समाज व्यवस्थेचे आकलन, चळवळींची परिभाषा असते.

## प्रा. डॉ. डी. ए. देसाई (माजी अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ शिवाजी विद्यापीठ)

वाढलेल्या वेगाच्यामुळे समाजामध्ये होणारे बदल लक्षात घेऊन मराठी विषयाची चर्चा होऊन विचार मंथन होण्यासाठी चर्चासत्राची गरज आहे. तसेच अभ्यासक्रम रचनेसाठी प्राचीन आणि आधुनिक साहित्याचा अभ्यास होण्याच्या दृष्टीने चर्चासत्राची गरज आहे. सैद्धांतिक अभ्यास करत आजचे बदलते संदर्भ मराठी प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी अभ्यासावेत. त्यासाठी बौद्धिक सहयोगी म्हणून किंवा मराठी भाषा अभ्यासक म्हणून बहुसंख्य प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी अशा चर्चासत्रात उपस्थिती दाखविणे गरजेचे आहे.

## डॉ. रवींद्र ठाकूर (मराठी विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

१९७० -७५ च्या सुमारास आनंद यादव यांनी कलावादी पठडीतून लेखनाची सुरुवात केली. त्यांच्या नेतृत्वाने चर्चासत्रे, संघटना होऊ लागल्या ग्रामीण साहित्य ही ओळख इथून सुरू झाली. पण काही लोक ग्रामीण साहित्य हे थोतांड आहे असे म्हणत. म.फुले, ताराबाई शिंदे यांनी खरी ग्रामीण साहित्याची सुरुवात केली. ही चळवळही त्यांनी कवेत घेतली प्रत्यक्ष कृतीशिवाय समाज बदलत नाही. सौंदर्य हे वस्तूमध्ये नसते तर ते आपल्या दृष्टीमध्ये असते.

## श्री. रामनाथ चव्हाण (प्रमुख अण्णाभाऊ साठे अध्यासन पुणे विद्यापीठ, पुणे)

परंपरा कायम ठेवून कार्य करणे, परिवर्तनाचा आग्रह धरणे हा चळवळीचा हेतू असतो. विशिष्ट भूमिका आणि तत्त्वज्ञान घेऊन चळवळी पुढे आल्या. बाबासाहेब जन्माला आले नसते तर फुले, गांधी, तुकाराम, गाडगेबाबा, मार्क्स जगाला कळले नसते. अध्यात्माला नीतिमत्तेची जोड असल्याशिवाय समाजाचे पोषण होऊ शकत नाही. १९७० नंतर दलित चळवळ निर्माण झाली आणि त्यातून पुढे वंचित, भटके, हे एकत्र आले.

## डॉ. सुनीलकुमार लवटे (सदस्य : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ)

काही बदल हे मंदगतीने होतात त्यात वंचितांच्या साहित्याचा उल्लेख करता येईल जातिधर्माच्या पलीकडे असणारे लोक यात येतात अनाथ, अपंग, यांना दलितांनी आपले मानले नाही. साहित्याचा आणि समाजाचा इतिहास उघड्या डोळ्यांनी वाचला पाहिजे. ज्या वर्गांशी आपले काही देणे-घेणे नाही असे लोक म्हणजे वंचित उदा. कैदी, अनाथ, अपंग, मतिमंद, बालसुधारगृह, शासकीय वसतिगृह २१ व्या शतकात जात, धर्मावर आधारीत व्यवस्था राहणार नाही. तर शोषक आणि शोषण करणारे हे दोन वर्ग राहणार आहेत.

## मा. श्रीराम पवार (संपादक दै. सकाळ, कोल्हापूर)

मराठी भाषेत अधिक चढउतार होऊ लागत आहेत. अनेक शतके मराठी भाषा ही राहणार आहे. साहित्य ही व्यापक अर्थानं संवादाची बाब आहे. संवाद प्रक्रियेचा भार कोणावरही लादू नये. मराठी साहित्यात निर्माण झालेल्या चळवळी त्यात प्रवाह आवश्यक आहे. मध्यवर्ती हा साहित्याचा प्रवाह असतो. जीवन जगत असताना समाजातील त्या त्या काळातील घटना यातून साहित्य निर्माण व्हावला पाहिजे. सामाजिक चळवळींनी साहित्यात बदल घडवणे आवश्यक आहे. या प्रवाहाचा, बदलाचा आढावा घेणे गरजेचे आहे.

## कॉ. गोविंद पानसरे (राष्ट्रीय पातळीवरील ज्येष्ठ विचारवंत)

समाजामधील संवेदनहिनता आत्मकेंद्रता वाढत आहे. ही बाब चिंताजनक आहे. चळवळी मध्येच जग बदलण्याचे सामर्थ्य असते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. त्यावर किती कादंबऱ्या कविता प्रसिद्ध झाल्या हे तपासण्याची वेळ आली आहे. चळवळीला चालना साहित्य देते. याचा शोध घेणे, आजपर्यंत साहित्याने चळवळींना किती चालना दिली याचा अभ्यास व्हायला हवा. चळवळी व साहित्य यांचा संबंध नाही असे म्हणणारा एक घटक आहे. पण तसे करून चालणार नाही. या दोन्ही मधील एक बाजू स्वीकारावी लागेल. त्याच बरोबर ज्ञानाचे जे वस्तुकरण झाले आहे त्याचा शोध घ्यावा लागेल.

❖❖❖

# वाङ्मयीन चळवळीचे साहित्यशास्त्र

**डॉ. वासुदेव सावंत**
मराठी विभाग प्रमुख, गोवा विद्यापीठ, गोवा

वाङ्मयीन चवळींच्या निर्मितीचे कारण प्रस्थापित साहित्यव्यवस्थेविषयी वाटणारे असमाधान किंवा विद्रोह हे असते आणि वाङ्मयीन चळवळीचा संबंध साहित्यातील परिवर्तनाशी असतो.

साहित्यात होणारे प्रत्येक परिवर्तन किंवा येणारा नवा प्रवाह चळवळीच्या स्वरूपाचा असेल असे नाही. विशिष्ट उद्दिष्टाने जाणीवपूर्वक, संघटितपणे केलेला, संस्था, संमेलने, मुखपत्रे (नियतकालिके) अशा साधनांद्वारे प्रस्थापित साहित्यव्यवस्थेत बदल घडविण्यासाठी संघटितपणे केलेले प्रयत्न याला वाङ्मयीन चळवळ किंवा आंदोलन म्हणता येईल. मराठीत केशवसुतांच्या काळात आधुनिक कवितेच्या रूपाने किंवा पुढे गाडगीळ-मर्ढेकरांच्या काळात नवकथा, नवकवितेच्या रूपाने आलेले परिवर्तन यामागे प्रस्थापितविरोध, नवी साहित्यमुल्यप्रणाली, एकाच उद्दिष्टाने अनेकांनी लिहिणे ही वैशिष्ट्ये असूनही केशवसुतकालीन आधुनिक कविता किंवा पुढील नवकविता, नवकथा या परिवर्तनांना वाङ्मयीन चळवळी असे आपण म्हणत नाही.

साहित्य-परिवर्तन घडवून आणणाऱ्या काही चळवळी केवळ वाङ्मयीन उद्दिष्ट व कार्यापुरत्याच मर्यादित असतात तर काही चळवळी मूलतः सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक उद्दिष्टांनी निर्माण झालेल्या पण या उद्दिष्टांसाठी प्रमुख साधन म्हणून साहित्याची निर्मिती करणाऱ्या व साहित्याच्या नव्या रूपाचा आग्रह धरणाऱ्या असतात. मराठीतील आधुनिक कविता किंवा नवकथा-नवकविता किंवा लघुनियतकालिकाची चळवळ ही परिवर्तने सकृत्दर्शनी केवळ वाङ्मयीन पातळीवरची तर मध्ययुगातील वारकरी संतसाहित्याची चळवळ, किंवा ग्रामीण, आदिवासी, दलित साहित्याच्या स्वरूपात झालेली परिवर्तने केवळ वाङ्मयीन पातळीवरची नाहीत. त्यांच्यामागे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय संदर्भ/उद्दिष्ट्ये स्पष्टपणाने आहेत.

वाङ्मयीन चळवळी किंवा परिवर्तने यात उद्दिष्टांच्या दृष्टिने असा भेद करता येत असला तरी साहित्यक्षेत्रातील कोणत्याही परिवर्तनाला, चळवळीला सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ अपरिहार्यपणे असतात.

कोणत्याही चळवळीमागे एक निश्चित उद्दिष्ट - एक निश्चित जीवनदृष्टी म्हणजे काही विशिष्ट सामाजिक, राजकीय आशाप्रकारची भूमिका आणि या जीवनदृष्टीला अनुरूप साहित्यदृष्टी असली पाहिजे.

मराठीतील वाङ्मयीन चळवळीपैकी कोणत्या चळवळींमागे निश्चित अशी जीवनविषयक आणि साहित्यविषयक तात्त्विक भूमिका आहे हे तपासून पाहिल्यास काही चळवळीचा अपवाद सोडल्यास बऱ्याच चळवळींमध्ये भूमिकेबाबत संदिग्धताच दिसते. प्रस्थापित व्यवस्थेत आपली, आपल्या समूहाची दखल घेतली जाणे, व्यवस्थेत सहभाग मिळवणं, साहित्यसंस्थेत किंवा संमेलनात अध्यक्षपदासारखे एखादे पद मिळवणे अशा उद्दिष्टांपुरत्याच काहीवेळे चळवळी मर्यादित झालेल्या दिसतात.

एखादी वाङ्मयीन चळवळ प्रस्थापित साहित्यव्यवस्थेला किती प्रमाणात धक्का देऊ शकली, उद्दिष्ट साध्य करण्यात तिला कितपत यश आले, नवा साहित्यप्रवाह निर्माण करू शकली का, नवे साहित्यविचार रूजवू शकली का, नव्या विचारांच्या किती लेखकांना तिने पुढे आणले आणि दर्जेदार सकस साहित्य किती प्रमाणा निर्माण केले यावरून वाङ्मयीन चळवळीच्या यशापयशाचे मूल्यमापन करता येते.

सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक किंवा वाङ्मयीन उद्दिष्ट साध्य झाले की चळवळ समाप्त होते पण मराठीतील बहुतांश वाङ्मयीन चळवळी पुरेशा उद्दिष्टपूर्तीऐवजी व्यक्तिगत अथवा अन्य कारणांनीच ओसरल्या असे दिसून येते.

प्रत्येक वाङ्मयनी चळवळीची प्रस्थापितविरोधी एक साहित्यदृष्टी असते किंवा असावी लागते. यातूनच चळवळीचे साहित्यशास्त्र निर्माण होते. दलित साहित्य, जनसाहित्य या चळवळींनी आपल्या चळवळीचे साहित्यशास्त्र/सौंदर्यशास्त्र मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण माझ्या मते समाजपरिवर्तनाची भूमिका घेऊन उभ्या राहणाऱ्या वाङ्मयीन चळवळींचे प्रत्येकाचे वेगवेगळे साहित्यशास्त्र असण्याची गरज नाही. प्रस्थापित वर्गाच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक अधिसत्तेच्या परिवर्तनवादी, विषमताविरोधी भूमिका घेतांना कलावादी, सौंदर्यवादी साहित्यशास्त्राला पर्यायी असे जीवननिष्ठ, जीवनमूल्यांची कसोटी वापरणारे आणि साहित्याची सामाजिकतेपासून फारकत न करणारे असे पर्यायी साहित्यशास्त्र सर्व चळवळींनी उभे केले पाहिजे. प्रस्थापित सौंदर्यवादी साहित्यशास्त्राच्या विरोधात वेगळे असे साहित्यविचार मराठीत म. फुले यांच्यापासून ते भालचंद्र नेमाडे यांच्यापर्यंत अनेकांनी मांडलेले आहेत. या विचारांची सुसंगत मांडणी करून या चळवळीचे पर्यायी साहित्यशास्त्र उभे करता येऊ शकते. त्यासाठी या सर्व चळवळींना 'सर्व मुनष्याच्या मानवी हक्कांविषयी विचार न करता हे हक्क ज्यांच्या खुशीने देववत नाहीत त्यांच्या सभा आणि पुस्तकातील भावार्थाशी आमच्या सभा-पुस्तकांचा मेळ बसत नाही' हे महात्मा फुले यांनी न्या. रानडे यांना लिहिलेले वाक्य प्रेरणादायी ठरेल.

❖❖❖

# स्त्रीविषयक चळवळ आणि मराठी नियतकालिके

**डॉ. सुनीता लेंगडे**
घोडावत महाविद्यालय, जयसिंगपूर.

साहित्य आणि समाजजीवन यांचा अन्योन्य संबंध आहे, याविषयी आता दुमत असण्याचं कारण नाही. १९ व्या शतकातले इंग्रजी राज्याचे आगमन ही राजकीयदृष्ट्या महत्त्वाची तशी मराठी वाङ्मयालाही वेगळे वळण लावणारी घटना.

दुसऱ्या बाजीरावाची कारकीर्द-रंगेलपणा, व्यभिचार, जाचक रूढी, वेडंगळ कल्पना, चातुर्वण्य व्यवस्था यांचे प्राबल्य, कन्याविक्रय, केशवपन, सतीची चाल, स्त्रीशिक्षणाला विरोध, बालविवाहाची प्रथा, विधवाविवाहाला विरोध, बालजरठविवाह पद्धत, स्त्रियांची उपेक्षा अशा अनेक प्रश्नांनी हा कालखंड गजबजलेला, काही विचारवंत, सुधारक, नवशिक्षित यांच्याद्वारे प्रबोधन, धर्मसुधारणेच्या चळवळी, व्याख्याने, अधिवेशने, जाहीर निवेदने, अशी नाना वर्तुळे वस्तारत, एकमेकांना छेद देत स्त्रीजागृतीविषयक पर्यावरणाची महाराष्ट्रात निर्मिती.

चळवळ - समाजमनात विशिष्ट मूल्यांसाठी चाललेला झगडा. नानाविध स्पंदन - नवं सामाजिक पर्यावरण - कलाकृतीची नवी बीजे लेखकाच्या मनात - चळवळी आणि वाङ्मय अक्षर वाङ्मयात जमा होणार नाही पण पावलापुरता प्रकाश या न्यायानं आपला काळ जागता ठेवतात.

१९ व्या शतकातील नियतकालिकांचे स्त्रीजागृतीसाठी प्रयत्न. 'स्त्री सुधारणा म्हणजे समाजसुधारणा', स्फुटलेख, संपादकीय, कथा, नाटके आणि जाहिरतीसुद्धा या समाजाची मानसिकता, अभिरूची आणि जीवनाविषयक जाणीव प्रकट करतात. सुमित्र, स्त्रीभूषण, विविधज्ञानविस्तार, अबलामित्र, स्त्रीसद्बोधचिंतामणि, गृहिणी, आर्यभगिनी, मंनोरंजन, भगिनी समाचार ही स्त्रीजीवनाला वाहिलेली नियतकालिके.

यातून बालविवाह, जठरकुमारीविवाह, स्त्रीशिक्षण, सतीची चाल, विधवापुनर्विवाह इ. विषयांवर लेखन, काशीबाई नवरंगे - 'मिश्रविवाह', कुमारी सोकरीबाई मानकर - 'आपली उन्नती करण्यास स्त्रियांनी काय केले पाहिजे ?' - विचार प्रवृत्त केले. 'स्त्रीभूषण' ने तर स्त्रियांना ज्ञानी करणं या अर्थाची पंक्ती मुखपृष्ठाच्या शिरोभागीच ठेवली. वेणूताई नामजोशी - 'काही सामाजिक सुधारणासंबंधाने सुशिक्षित बंधूस विनंती' तून जरठकुमारी विवाहाविरूद्ध जाहीर विचार प्रगटन, पारंपारिकतेला छेद देणारा नवामार्ग समाज ताबडतोब स्वीकारत नसतो पण या नियतकालिकांनी समाजाला अंतर्मुख करायला लावलं.

यामुळे लेखकाचं धाडंस, संपादनाची जबाबदारी या गोष्टी म्हणजे स्त्रीच्या सामाजिक आणि वाङ्मयीन कार्याच्या दृष्टीनं पुढलं पाऊल. २० व्या शतकाच्या तिसऱ्या दशकांत स्त्रीजीवनाविषयीची त्यांची भूमिका खूपच निराळी. पण हे धाडसं निर्माण करण्यात मराठी नियतकालिकांची प्रेरणा खूपच महत्त्वाची.

या काळाच्या पार्श्वभूमीवर या लेखक, संपादकांच्या निष्ठा, त्याग आणि समर्पण हे नजरेआड करतां येत नाही. स्त्रियांचे प्रश्न, दुःखे याविषयी समाजमनात सहानुभूती निर्माण करायला लावणे यासाठी नियतकालिकांची मदत. म्हणूनच त्यांच्या वाङ्मयीन योगदानासोबत त्यांची सामाजिक फलश्रुतीही तितकीच महत्त्वाची.

❖❖❖

# दलित साहित्य व चळवळीचे बदलते संदर्भ : प्रेरणा व प्रवृत्ती

**प्रा. आनंद साठे**

मराठी विभाग प्रमुख, कला व वाणिज्य महाविद्यालय मेढा,
ता. जावली, जि. सातारा

दलित साहित्य व चळवळीचे बदलते संदर्भ, प्रेरणा व प्रवृत्ती यांच्या अनुषंगाने विवेचन करताना सुरूवातीस समाज व साहित्याची वाटचाल पहावी लागते व नंतर दलित जाणिवांचे साहित्य व त्यानंतर चळवळींची वाटचाल पहावी लागेल. त्या अगोदर ज्या चळवळी व जे प्रवाह होते. उदा. संत साहित्य, अर्वाचीन, ग्रामीण व आधुनिक या साहित्य प्रकारात दलित जाणीवा दिसतात का ? ते पहाणे गरजेचे आहे. संत काळात संत चोखामेळा व त्यांच्या कुटुंबियांच्या अभंगातून त्या काळात उच्चवर्णियांकडून त्यांना त्रास झाला. त्याचे वर्णन आले आहे. ही पहिली दलित जाणीव होती. त्यानंतर शाहीरी वाङ्मय, त्यानंतर अस्पृश्यता निवारण व महात्मा फुले यांच्याकाळात सत्यशोधकी जलसे, आंबेडकरांच्या काळात आंबेडकरी जलसे यांचे योगदान हे महत्त्वपूर्ण मानले जाते. या जलशांची प्रेरणा घेऊन दलित कवितेने जन्म घेतला. डॉ. आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा ही दलितांमधील सुशिक्षित तरूणांना खूपच प्रेरक ठरली. कविता, कथा, आत्मकथनांच्या माध्यमातून दलित साहित्य निर्माण होऊ लागले. बाबूराव बागूल, अण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, नामदेव ढसाळ, ज. वि. पवार, यशवंत मनोहर, वामन निंबाळकर, त्र्यंबक सपकाळे, केशव मेश्राम आदी प्रथितयश कविंच्या कविता त्यानंतर दया पवार, शकंरराव खरात, लक्ष्मण माने, पार्थ पोकळे, माधव कोंडविलकर आदी दलित लेखांची आत्मकथने प्रसिद्ध झाली. बाबूराव बागूल, वामन ओहाळ, शंकरराव खरात व इतरांचे कथा लेखनही सुरूच होते. या सर्वांच्या साहित्य विचारामागे डॉ. आंबेडकरांचे विचार होते. दलित समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एकीकडे डॉ. आंबेडकर झटत होते. तर त्यांच्या विचारांनी प्रभावित झालेली तरूण पिढी साहित्याच्या माध्यमातून समाजाच्या वेदना मांडत होती. दरम्यान डॉ. आंबेडकरानी 'शेड्युल्ड कास्ट फेडरेशन'ची स्थापना केली. त्यानंतर धर्मांतर आणि डॉ. आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. त्यांची इच्छा पूर्ण करण्यासाठी त्यांच्या अनुयायांनी 'रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया' हा पक्ष स्थापन केला. दादासाहेब गायकवाडांनी ही दलित चळवळ पुढे नेटाने चालवली. परंतु काँग्रेसने दादा साहेबांना आपल्या जाळ्यात ओढले. चळवळीत दुफळी माजली परंतु नामदेव ढसाळ, राजा ढाले, ज. वि. पवार, अर्जुन डांगळे व इतर दलित तरूणांनी दलित पँथर ही लढाऊ संघटना स्थापन केली. नामदेव ढसाळ व राजा ढाले यांच्यात मतभेद झाले. ही संघटना बरखास्त करून राजा ढाले यांच्यात मतभेद झाले. ही संघटना बरखास्त करून राजा ढाले यांनी 'मास मुव्हमेंट' नावाची संघटना सुरू केली. चळवळीमधून कार्यकर्ते काम करीत असताना साहित्य निर्माण होत होते. या सर्व साहित्यिक व त्यांच्या चळवळीचे साहित्याचे, योगदान या शोध निबंधात थोडक्यात नोंदविले आहे.

आंबेडकर साहित्य व मार्क्सवादी साहित्य मानणारे भिन्न प्रवाह, ग्रामीण व आधुनिक साहित्यात दलित जाणीवा हा वादाचा मुद्दा ठरला. दलित चळवळीच्या नेत्या कार्यकर्त्यांमध्ये 'मार्क्सवाद' हा वाद झाला. तर लेखक व समिक्षकांमध्ये ही वाद बहुचर्चित ठरला. बौद्ध साहित्य संमेलने, दलित साहित्य संमेलन आणि गटबाजीची ठळक उदाहरणे यांचा ही आढावा या शोध निबंधात घेतला आहे.

सध्यस्थितीत जागतिकीकरणाचा सांस्कृतिक, सामाजिक, साहित्यिक, आर्थिक क्षेत्रावर प्रभाव पडला. दलित साहित्य क्षेत्र ही याला अपवाद नाही. दलित साहित्याची विद्रोह, नकार, उपहास, बंड ही वैशिष्ट्ये त्या साहित्याची बोली, भाषा व त्यांनी नाकारलेले साहित्य शास्त्र यावरही या जागतिकीकरणाचा प्रभाव पडला. जागतिकीकरणाने जात व त्यावर आधारित विषमता पाहिली नाही. वर्गीय लढा सुरू झाला. भांडवलदार विरूद्ध कामगार, गरीब श्रीमंत हा भेद सुरू झाला. त्यामुळे दलित साहित्यानेही आपले स्वरूप बदलले. दलित साहित्य संमेलनाऐवजी विद्रोही साहित्य संमेलने भरू लागली. दलित साहित्यिकांनी आपापले सवते सुभे मांडायला सुरूवात केली. 'मी मोठा, की तू मोठा ?' यांची पुनरावृत्ती होऊ लागली. दलित साहित्य चळवळीचे व सामाजिक संघटनांचे एन. जी. ओकरण झाले ाहे. आंबेडकरवादी साहित्य चळवळीचे संदर्भ, स्वरूप व प्रवृत्ती बदलत गेली. संगणक, माहिती आणि तंत्रज्ञानात वापरले जाणारे शब्द साहित्यात येऊ लागले. त्यामुळे साहित्य साहित्यिक व चळवळींचीवृत्ती बदलत चालली आहे. या बदलत्या प्रेरणा व प्रवृत्या कोणत्या ? या चळवळींचे साहित्याचे स्वरूप कसे बदलत चालले आहे ? याचा आढावाही या शोध निबंधात घेतला आहे.

❖❖❖

# 'भटक्या विमुक्तांची वाङ्मयीन चळवळ'

**डॉ. गिरीश मोरे**
राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय, रूकडी

कोणत्याही चळवळीचा उदय हा समाज जीवनाच्या पार्श्वभूमीवर होत असतो. 'चळवळ' हा शब्द मानवी समूहाच्या वर्तनव्यवहारास अनुसरून वापरलेला आहे. विशिष्ट उद्दिष्ट समोर ठेवून परिवर्तनासाठी कृती करणारा समूह चळवळीसाठी अपेक्षित असतो. कोणतीही चळवळ परिवर्तनासाठी, व्यापक जनाधारावर, विशिष्ट वैचारिक पायावर, अंतिम उद्दिष्ट समोर ठेवून, जाणीवपूर्वक कृतीच्या आधारावर, आत्मभान जागृत समाजाकडून, विशिष्ट प्रेरणा स्वीकारून कार्यरत झालेली असते. भटक्या विमुक्तांची चळवळही अशाच अंगाने विकसित होत आहे.

आंबेडकरी वाङ्मयीन चळवळीची प्रेरणा घेऊन उदयास आलेली एक चळवळ म्हणजे भटक्या वमुक्तांची साहित्य हे अस्तित्वासाठी लढा देणारे साहित्य आहे. हा समाज अमानुष जातपंचायतीमध्ये अडकलेला आहे. भटक्या विमुक्तांचे साहित्य जातपंचायतीमध्ये अधोगतीला गेलेल्या माणसांच्या मुक्तीचा विचार मांडते. २८ भटक्या आणि १४ विमुक्त (गुन्हेगार मानलेल्या) जमातींना भटकावे लागते. त्यांना स्थैर्य नाही. हे साहित्य भटक्या प्रवृत्तीविरूद्धचा विचार मांडते. पूर्वाश्रमीच्या गुन्हेगार मानलेल्या व नंतर मुक्त केलेल्या विमुक्तांवर मारलेल्या गुन्हेगारीचा शिक्का हे साहित्य पुसून टाकण्याचा विचार मांडते. प्रस्थापित समाज हा भटक्या विमुक्त जमातींकडे गुन्हेगार, चोर या दृष्टीने पाहतो. त्यामुळे प्रस्थापित समाजाच्या पारंपरिक दृष्टिकोणाविरूद्धचा विचारही हे साहित्य मांडते. शिवाय पोटासाठी शहरात, झोपडपट्टीतून राहणाऱ्या भटक्या विमुक्तांच्या प्रश्नाचा विचारही हे साहित्य करते. या दृष्टीने १९७२ पासून भटक्या विमुक्ताची चळवळ कृतीशील झाल्याचे दिसून येते.

१९७२ पासून या चळवळीने गती घेतली. दौलतराव भोसले, बाळकृष्ण रेणके, लक्ष्मण माने, मोतीराज राठोड, लक्ष्मण गायकवाड, व्यंकाप्पा भोसले अशा तरूणांनी भटक्या विमुक्तांच्या प्रश्नासंदर्भात मोर्चे, रास्ता रोको, परिषदा, आंदोलने केली. त्यावेळी आंबेडकर चळवळ ही बहरात होती. त्या आधारे १९८० च्या सुमारास भटक्या विमुक्तांची आत्मकथने लिहिली गेली. लक्ष्मण माने यांच्या 'उपरा' (१९८०) मधून कैकाडी जमात चित्रित झाली आहे. दादासाहेब मोरे यांच्या 'गबाळ' (१९८३) मधून कुडमुडे जोशी ही जमात येते. लक्ष्मण गायकवाड यांच्या 'उचल्या' (१९८७) मधून पाथरूट जमात येते. भीमराव गस्ती यांच्या 'बेरड' (१९८७) मधून गुन्हेगार बेरड जमात येते. आत्माराम राठोड यांच्या 'तांडा' (१९९०) मधून लमाण/बंजारा जमात येते. यामध्ये जनाबाई गिऱ्हे (मरणकळा), विमल मोरे (तीन दगडाची चूलद या भटक्या विमुक्त स्त्रियांची आत्मकथनेही प्रसिद्ध आहेत.

भटक्या विमुक्तांच्या कादंबरीमध्ये रावजी राठोड (गोठण), लक्ष्मण गायकवाड (उठाव), अशोक पवार (इळनमाळ), प्रकाश जाधव (तिम्मा), नागनाथ पाटील (लंबाडी) यांच्या कादंबरीचा उल्लेख करता येतो. भटक्या विमुक्तांचे काव्यलेखनही प्रकाशित होत आहे. कथासंग्रहामधून हरिश्चंद्र राठोड, आत्माराम राठोड, प्रदीप राठोड यांनी आपापल्या समाजातील जीवन मांडले आहे.

कोणतीही वाङ्मयीन चळवळ विशिष्ट प्रवृत्तीमधून जन्मास येत असते. भटक्या विमुक्तांच्या वाङ्मयीन चळवळीचीही प्रेरणा, प्रवृत्ती, संकल्पना निश्चित होत आहे. भटक्या विमुक्तांमध्ये विविध भटक्या जमाती आहेत. त्यांच्या प्रश्नांसाठी चळवळीतल्या लेखकांनी एकत्र येऊन विचार विनिमय करणे आवश्यक आहे. असे झाले तर आंबेडकरी वाङ्मयीन चळवळीला समांतर वाङ्मयीन चळवळ म्हणून भटक्या विमुक्तांच्या चळवळीचा विचार करता येतो.

❖❖❖

# ‘फुले आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य’

**प्रा. सौ. शीला रत्नाकर**
मराठी विभागप्रमुख, यशवंतराव चव्हाण कला व वाणिज्य महाविद्यालय, इस्लामपूर

रुढार्थाने ज्या साहित्य प्रवाहाला दलित साहित्य असे म्हणतात, त्या साहित्य प्रवाहाला वेगळ्या नावाने ओळखले जावे यासाठी आंबेडकरी विचारवंत, साहित्यिक, अभ्यासक वेगवेगळ्या पातळीवर प्रयत्न करीत आहेत. ‘दलित साहित्य’ या संकल्पनेऐवजी बौद्ध साहित्य, आंबेडकरवादी साहित्य, अब्राह्मणी साहित्य आणि फुले आंबेडकरी साहित्य अशा पर्यायी नावे दिली आहेत. यामध्ये भाऊसाहेब आडसूळ, विजय सोनवणे, शरणकुमार लिंबाळे, यशवंत मनोहर, शरद पाटील, राजा ढाले इत्यादिंचा समावेश आहे आणि आपणच दिलेले नाव कसे संयुक्तिक नि उपयुक्त आहे. हे पटवून देण्यासाठी साहित्य संमेलन घेणे, अध्यक्षीय भाषण देणे, लेख लिहिणे, मुलाखती देणे वगैरे प्रकारांनी ते प्रयत्न करीत आहेत. ‘दलित साहित्य’ हे नाव बदलण्यासाठी ‘दलित साहित्य’ विरोधकांचे हे प्रयत्न आहेत; तर दलित साहित्य हे नाव बदलू नये यासाठी ‘दलित साहित्य’ समर्थकांचेही असेच प्रयत्न सुरू आहेत. पर्यायाने आपल्या भाषेत ही चळवळ सुरू आहे. म्हणून या चळवळीला ‘दलित साहित्याची नामांतर चळवळ’ असे संबोधले जाते.

१९६१ साली ‘दलित साहित्य’ याऐवजी ‘बौद्ध साहत्य’ हे नाव आपल्या साहित्य चळवळीला देऊन साहित्याची नामांतर चळवळ सुरू केली. त्या महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषदने २९ फेब्रुवारी, १९७६ साली मुंबई येथे १४ वे बौद्ध साहित्य संमेलन आयोजित केले होते. या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते राजा ढाले. या साहित्य संमेलनातील राजा ढाले यांचे अध्यक्षीय भाषण दलित साहित्याच्या नामांतर चळवळीतील क्रांतीकारी घटना म्हटली पाहिजे. १९७६ पासून ते आजतागायत त्यांची भूमिका मात्र वैचारिकदृष्ट्या अधिकाधिक व्यापक होताना दिसते आहे. कारण ७६ साली आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य असे म्हणणारे राजा ढाले आज ‘फुले आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य’ या टप्प्यावर येऊन ठेपले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने निर्माण झालेल्या साहित्य प्रवाहाला रुढार्थाने दलित साहित्य या नावाने संबोधणारे आणि हे नाव असू नये म्हणून पर्यायी संकल्पना मांडणारे यांचीही दलित साहित्याच्या नामांतराची चळवळ आहे. विविध संकल्पना मांडणाऱ्या अभ्यासकांनी आपली संकल्पना कशी योग्य आहे यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून विविध मते मांडली आहेत. पैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, त्यांचे कार्य, विशेषतः त्यांनी केलेली धम्मक्रांती या गोष्टींचा विचार करून राजा ढाले यांनी मांडलेली ‘फुले आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य’ ही संकल्पना तशी योग्य आणि अभ्यासपूर्ण आहे. इतकेच नव्हे तर दलितत्व नाकारून धम्म विचार स्वीकारलेल्या प्रत्येकाला तशी पटणारी आहे, हे सांगण्यासाठीच प्रस्तुत निबंधामागील हेतू आहे.

❖❖❖

# 'दलित साहित्य चळवळीचे बदलते संदर्भ'

**डॉ. सौ. सविता अशोक व्हटकर**
अधिव्याख्याती, मराठी विभाग, भोगावती महाविद्यालय,
कुरूकली, ता. करवीर, जि. कोल्हापूर.

दलित साहित्याच्या चळवळीचे वेगळेपण हे जसे दलितत्त्वातून व्यक्त होणाऱ्या जाणीवांवर अवलंबून आहे. तसेच त्या साहित्याचे श्रेष्ठत्व किंवा समानत्व लेखकांनी व्यक्त केलेल्या जीवनात जाणीवांच्या उत्कटतेवरच अवलंबून आहे. म्हणजे दलित लेखकांचे लेखन हा एक जिवंत अनुभव असतो. तर दलितेतर लेखकाने लिहिलेले दलित साहित्य हे जिवंत नसते कारण त्यात उत्कटता असत नाही. हे ही स्वाभाविकच आहे. दलित लेखकाचे जग हे त्यांचे स्वतःचे असे जग आहे. हे त्यांनी भोगलेले आहे. ते त्या जगातच वाढलेले आहे.

दलित साहित्याच्या प्रबोधनाचे विविध प्रवाह डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ, मार्क्सवादी विचारधारा स्वातंत्र्यपूर्ण व स्वातंत्र्योत्तर काळात बहुजन समाजात होऊ घातलेली जागृती तिच्यातून त्यांना प्राप्त झालेले आत्मभान इत्यादिंमुळे साहित्यिक आणि विचारवंत यांनी दलित साहित्याची चळवळ जिवंत ठेवण्यात यश मिळविलेले आहे.

दलित साहित्याच्या चळवळीमुळे जे आत्मभन दलितांना प्राप्त झाले. त्याचा परिणाम म्हणून दलित लेखक आपल्या सभोवतालचं वास्तव न्याहाळू लागला. त्या वास्तवाशी आपला नातेसंबंध शोधू लागला. इतिहासात आपले स्थान पाहू लागला. जी संस्कृती आपली आहे असे हजारो वर्षे तो मानत आला. ह्या संस्कृतीशी असणारा आपला नातेसंबंध न्याहाळू लागला हा शोध म्हणजे आत्मशोध या आत्मशोधाची विविध पातळीवरील रूपे आपणाला दलित साहित्याच्या चळवळीच्या रूपातच आढळून येतात.

दलित साहित्यानिर्मितीला सुरूवात होण्यापूर्वीची प्रक्रिया पाहिल्यास 'दलितांची चळवळ'च कारणीभूत असल्याचे दिसते. बरेचसे दलित साहित्यिक हे स्वतःला प्रथम दलित चळवळीचा कार्यकर्ता समजतात व त्यानंतर साहित्यिक समजतात. ह्या सर्व विवेचनावरून सहज विचार करता येतो तो म्हणजे दलित चळवळ आणि दलित साहित्यनिर्मिती ह्यांचा निश्चितच परस्पर संबंध आहे.

❖❖❖

# दलित साहित्याची चळवळ : बदलते संदर्भ

**प्रा. सतीश कामत**
कला व वाणिज्य महाविद्यालय, फोंडाघाट, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग

दलित चळवळीचे आणि साहित्याचे मूळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक पुनर्रचनेच्या विचारात आहे. वर्णजातिव्यवस्थाशिरोधार्य मानणाऱ्या आणि अंधश्रद्धा पसरवणाऱ्या विषमतापूर्ण हिंदुत्ववादी तत्त्वज्ञानाला डॉ. आंबेडकरांनी नाकारले. त्यांनी सर्व प्रकारच्या गुलामीला व शोषणाला विरोध दर्शविला आणि स्वातंत्र्य, समता व न्याय या मूल्यांचा पुरस्कार केला. सम्यक क्रांती झाल्याशिवाय 'आत्मसन्मान' प्राप्त होणार नाही, हे त्यांना ज्ञात होते. म्हणूनच आत्मसन्मान हे त्यांच्या लढ्याचे प्रमुख सूत्र होते. एकंदरीत अशा प्रकारच्या आंबेडकरी विचाराचे व तत्त्वज्ञानाचे भक्कम अधिष्ठान दलित चळवळ आणि साहित्याला लाभलेले आहे.

गेल्या ५०-६० वर्षात दलित चळवळ आणि दलित साहित्याने वेगवेगळी वळणे घेतलेली आहेत. त्यातील काही स्वागतार्ह आहेत तर काही चळवळ आणि साहित्य दोघांनाही मारक ठरू शकतील अशी आहेत. सर्वात महत्त्वपूर्ण आणि चांगला बदल घडून आला तो म्हणजे बौद्ध समाजातील लेखकांव्यतिरिक्त वेगवेगळ्या जातिस्तरातील उपेक्षित-वंचितांनी आपले अनुभव मांडायला सुरुवात केली. त्याचप्रमाणे अनेकांनी बुद्ध, फुले, शाहु, आंबेडकरांनी मांडलेल्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, स्त्रीविषयक विचारांवर पुस्तके लिहून वैचारिक लेखनाला गती दिली.

जागतिकिकरणामुळे तीव्र बनलेली सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विषमता हा २१ व्या शतकातील दलित साहित्याचा विषय बनत आहे. 'खाऊजा' च्या रगाड्यात दलित उपेक्षितांची होणारी परवड चित्रित करण्याचा प्रयत्न दलित कवी, लेखक करू लागले आहेत. नव्या मल्टिनॅशनल युगातील दलितांचे, शोषितांचे, वंचितांचे प्रश्न मांडण्याचे आव्हान दलित साहित्याने स्वीकारलेले असून 'खाऊजा' च्या व संगणकाच्या प्रभावातून जन्माला आलेल्या भाषेचाही वापर अनेक लेखक करू लागले आहेत. नवनिर्मितीची आणि समकालीन समाजाची गरज लक्षात घेऊन हा बदल घडतो आहे. अर्थात त्यामुळे आवर्तात सापडलेल्या दलित साहित्याला सोडविण्यासाठी मदतच होईल.

२१ व्या शतकातील बदलणाऱ्या संदर्भांचा आढावा घेताना. दलित साहित्यात अवतरणाऱ्या बौद्ध तत्त्वज्ञानाचा विचार करावा लागतो. बऱ्याच दलित लेखकांनी बौद्ध तत्त्वज्ञानाची जाणीवपूर्वक मांडणी करायला सुरूवात केली आहे. त्यामुळे बौद्ध संस्कार, बौद्ध विधी, हिंदू-बौद्ध अवस्थेतील मानसिकता यांचे चित्रण कथा, कविता, कादंबरीतून येऊ लागले आहे. यासंदर्भात शरणकुमार लिंबाळे, गौतमीपुत्र कांबळे, उर्मिला पवार आदींचा उल्लेख करता येईल.

आजच्या भरकटलेल्या दलित चळवळीला आणि नेत्यांना दिशा दाखविण्याचे काम अनेक लेखक मंडळी करीत आहेत. जी. के. ऐनापुरे, शरणकुमार लिंबाळे, रविचंद्र हडसनकर, किशोर घोरपडे ही मंडळी आंबेडकरी विचारधारेपासून दूर

जाणाऱ्या दलित चळवळीचे आणि राजकारण व साहित्य क्षेत्रातील कळप संस्कृतीचे चित्रण करीत आहेत. दलित लेखिकाही दलित साहित्यविश्वाला आपले मौलिक योगदान देत असून स्त्रीजीवन आणि दलित जीवन यात होणारी घुसमट व्यक्त करत आहेत. असे असले तरी दलित साहित्याला आलेले चळवळीचे भान सुटायला लागले असून बुद्धिवादी दलित लेखक विद्रोह आणि नकाराची अभिव्यक्ती टाळू लागले आहेत, नव्हे हे लेखक तंत्रात आणि आकृतिबंधात अडकत चालले आहेत. त्याचप्रमाणे अलिकडच्या नवजातियतेचे, जातिवाद्यांच्या नव्या षडयंत्राचे दर्शन घडविण्यात हा प्रवाह अपयशी ठरतो की काय असे वाटू लागले आहे.

अर्थात दलित साहित्य या संकल्पनेने आता जागतिक पातळीवर मान्यता मिळवलेली आहे. अनेक दलित कवी, लेखकांना आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पुरस्कार मिळाले आहेत. डॉ. गंगाधर पानतावणे यांनी तर अमेरिकेत भरलेल्या पहिल्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविले. त्यामुळे येत्या काळात दलित साहित्याचे भविष्य निश्चित उज्ज्वल आहे.

❖❖❖

# "आदिवासी साहित्य चळवळ : बदलते संदर्भ"

**प्रा. कैलास महाले**
मराठी विभाग – आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स, रामानंद नगर (बुर्ली)

स्वातंत्र्योत्तर काळात उदयाला आलेल्या अदिवासी साहित्याची चळवळ म्हणजे मानवमुक्ती आंदोलनाच्या व्यापक आघाडीचाच एक भाग आहे किंबहुना आदिवासी साहित्य हा अदिवासी समाजाच्या व्यापक आघाडीचाच एक भाग आहे. किबंहुना आदिवासी साहित्य हा अदिवासी समाजाच्या व्यापक चळवळीचाच एक भाग आहे. दलित साहित्य चळवळीप्रमाणे ही चळवळ मध्यवर्ती साहित्यात बळकट स्थान प्राप्त करु शकली नसली तरी ही चळवळ विकसित करण्यासाठीचे प्रयत्न आज अनेक आदिवासी विचारवंत, साहित्यकांकडून होताना दिसतात. या चळवळीच्या माध्यमातून आज अनेक नवोदित साहित्यिक परिवर्तनाची, बंडाची व आत्मसन्मानाची जाणीव व्यक्त करतात.

आदिवासी साहित्यात समग्र चळवळ क्रांतीच्या दिशेने पुढे जाण्यासाठी आवश्यक असलेल्या संघटन सामर्थाकडे अनेक अदिवासींचे लक्ष वेधले जात असून चर्चा, परिसंवाद, संमलेने या माध्यमातून आदिवासी मुख्य प्रवाहात येण्याचा प्रयत्न करुन व्यवस्थेत आपले स्वंतत्र स्थान निर्माण करीत आहे.

जागतिकीकरणाच्या कालखंडात अनेक आव्हानांचा सामना करत आदिवासी साहित्य चळवळीच्या माध्यमातून आदिवासी धर्माचा शोध घेण्याचा प्रयत्नही अनेकजन करतांना दिसतात. समग्र आदिवासी चळवळ ही आज सगळ्याच प्रश्नांना हातावेगळे करु शकली नसली तरी मानवमुक्तीचा लढा लढून आदिवासींना आत्मसन्मान, आत्मगौरव प्राप्त करुन देण्याच्या दिशेने जात आहे असे मला वाटते. आदिवासी साहित्याचे अदिमता हे वैशिष्टय मध्यवर्ती ठेवून आदिवासींच्या अनोख्या संस्कृतीचे दर्शन घडविण्याबरोबर असंख्य जिव्हाळ्याच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम अदिवासी साहित्यिक चळवळीच्या माध्यमातून करत आहेत. मानवमुक्तीची लढाई मात्र अजून संपलेली नाही त्यामुळे अदिवासी चळवळींपुढे आज नवनवे प्रश्न उभे आहेत.

दुसरीकडे जुन्या ग्रथांची चिकित्सा करुन आदिवासींबद्दल पसरवले जाणारे गैरसमज, मराठी साहित्याच्या समिक्षकांचे आदिवासींच्या लेखनाकडे दुर्लक्ष, नियतकालिकांनी न घेतलेली दखल, विद्यापीठ व महाविद्यालयीन अभ्यासक्रमाला असलेली आदिवासी साहित्यांची ॲलर्जी हे जूने प्रश्नही पुन्हा पुन्हा डोक वर काढत आहेत. या प्रश्नांची सोडवणूक जेव्हा साहित्याच्या माध्यमातून होईल, तव्हाच अदिवासी चळवळ खऱ्या अर्थाने क्रांती घडून शकेल.

❖❖❖

# शेतकरी चळवळ

**प्रा. लक्ष्मण स. शिंदे**

आर्टस सायन्स व कॉमर्स कॉलज, रामानंदनगर (बुर्ली),
ता. पलूस, जि. सांगली.

## शेतकरी संघटना मूल्यमापन

ऐंशीचे दशक म्हणजे शेतकऱ्यांच्या चळवळींचं दशं होतं असं म्हटलं तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही. अनेक राज्यांत शेतकऱ्यांची आंदोलने चालू होती. बोनस पगारवाढीसाठी पांढरपेशांचे संप आणि कामगारांची आंदोलने यांचा सराव असणाऱ्या शहरवासियांना हजारो शेतकऱ्याच्या 'रास्ता रोको' आणि 'ठिय्या' आंदोलनांनी अचानकपणे हलवून सोडले. १९८० च्यापूर्वी शेतकऱ्यांची एवढी मोठी आंदोलनं झाले नव्हती. १९६० च्या दशका अखेरीस संकरीत बियाणे, रासायनिक खते यांचा जमाना बहारात आला. भारताच्या काही भागांमध्ये जलसिंचनाचा विकास झाला. यालाच हरितक्रांती या नावाने ओळखले जाऊ लागले. धान्योत्पादन वाढलं. शेती करणाऱ्यापैकी काही गटांचा स्तर उंचावला. आर्थिक व परिणामी राजकीय सत्ता त्यांच्या ताब्यात आली. महाराष्ट्रात मराठा, माळी, धनगर वैगरे जातींचा एक संपन्न थर तयार झाला. मात्र सत्तरीच्या दशकात आलेल्या दुष्काळाचा फटका या शेतकरी वर्गाला बसला. सरकार आपल्या संरक्षणासाठी विशेष काही करीत नाही या जाणिवेतून नाराजी निर्माण झाली. १९७० च्या दशकातील निवडनुकांमधून या वर्गाच्या हाती विशेष काही लागलं नाही. हरितक्रांतीमुळे समान हितसंबध तयार झाले होते. आत्मविश्वास वाढलेला होता. शेतकऱ्यांच्या एक मोठा वर्ग लढाईसाठी तयार होऊ लागला. शेतकऱ्यांचे अंतर्गत विविध स्तर होते. तरीही एका समान हितसंबधाच्या मुद्यावर हा वर्ग एकत्र येणे शक्य होते. इंदिरा गांधीा पराभव आणि पुनरागमन यामुळे स्थानिक राजकीय समीकरणे ढवळून निघत होती. अनेक राज्यांतील शेतकरी जातींच्या राजकारणाला कलाटणी मिळू लागली होती . या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटनेचा उदय झाला.

त्यांच्या मुख्य मागण्या:- शेतीपेक्षा उद्योगांना दिले जाणारे महत्त्व व झुपते माप बंद व्हावे. शहरांकडून होणारे ग्रामीण भागाचे शोषण थांबावे.

शेती व उद्योग अशी विभागणी केंद्रवर्ती मानल्याने शेतीअंतर्गत असणारं स्तरीकरण आणि विषमता यांचे अस्तित्व नाकारंल जातं किंवा दुय्यम महत्त्वाचे मानलं जातं. ऐंशीच्या दशकापासून शेतकरी चळवळींनी शेतीमालाला रास्त भाव मिळावा आणि शेतीसाठी वीज, पाणी, बियाणं व खते यांच्या किमंती नियंत्रित ठेवाव्यात किंवा त्यावर अनुदान असावं या मागण्या पुढे आणल्या. कर्ज माफीचा मुद्दा, शेतीमालाच्या विक्रीवरच्या क्षेत्रीय निर्बंधाना विरोध इत्यादी मुद्दयांचा समावेश चळवळींनी आंदोलनांमध्ये नेहमी केलेला दिसतो . त्याबरोबरच शरद जोशींनी खुल्या बाजारपेठेचा आणि जागतिकीरणाचा पुरस्कार करण्याची भूमीका घेतली. एवढेच नाही तर शेतकऱ्यांनी एकत्र येऊन शेतकी कंपनी काढण्याचा कल्पनेला पाठिंबा दिला. शेतकऱ्यांना किफायतशीर भाव मिळवणे आणि शेती व उद्योग यांच्यातील दरी कमी करणे या आर्थिक मागण्यांत सर्व शेतकरी संघटनांत एकवाक्यता होती. परंतु आर्थिक धोरण आणि राज्यसंस्थेची भूमिका या मुद्दयांवर मतभिन्नता दिसते. त्यामूळेच सर्व शेतकरी संघटनांचे सुसूत्रीकरण होऊ शकले नाही. त्यामुळे देशपातळीवरील संघटना निर्माण होऊ शकली नाही.

शेतकरी चळवळींना ती साध्य केली. महाराष्ट्रात शेतकरी संघटनेने 'रास्ता रोको' सारखी आंदोलेने केली. आपली ताकद दाखवून दिली. नाट्यपूर्ण आंदोलने केली. दिर्घकाळ चिकाटीनं लढा देणं हे शेतकरी चळवळीचं खरं बलस्थान होतं. शेतकरी चळचळींचा मुख्य राख सरकारवर होता. त्यामुळे ठिकठिलाणी सरकारविरोधी आंदोलनं झाली. मागण्याही सरकारला उद्देशून केल्या गेलेल्या दिसतात. महाराष्ट्रात शासनकर्ता वर्ग हा मुख्यत: शेतकरी वर्गातुन आलेला आणि शेतकरी समूहांच्या पाठिंब्यावर अवलंबून असणारा असूनही अनेक वेळा सरकारने आंदोलकांवर कारवाई केली. पोलीस, बळ, न्यायालयीन खटले यांना तोंड द्यावे लागले. संघटना या साऱ्याला पुरून उरल्या. अर्थात काही वेळा शेतकऱ्यांची आंदोलनं सरकारने 'मॅनेज ही केलेली दिसतात.

गेल्या दशकभरात शेती व उद्योगातील असंतुलन वाढूनही संघटना त्याबाबत काही करू शकत नाही. ही संघटना सरंजामदारी, बागायत, शेती करणाऱ्यांचा दबावगट असल्याचे दिसते. पाणीप्रश्न, अल्पभूधारक शेतकरी व शेतमजूर, दुष्काळ ग्रस्त, धरणग्रस्त वगैरेंसाठी संघटनेची कोणतीही कृती दिसत नाही. उलट शेतमालाला भाव हाच मुलभूत प्रश्न असल्याचे मानते. त्यामुळे व्यवस्था परिवर्तनाचे तत्वज्ञान यांच्यात दिसून येत नाही.

नव्याने आलेल्या जागतिकीकरणाचे संघटनेने स्वागत केलेले दिसते. शेतकऱ्याला आपला माल जगाच्या बाजारपेठेत नेता येईल म्हणून जागतिकीकरण फायद्याचे असल्याचे नेते सांगत आहेत. पण विषमतेने भरलेल्या जागतिक बाजारपेठेत भारतीय शेतीमाल आणखी दडपला जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आजच्या इतर चळवळींच्या दुरावस्थच्या काळात ही संघटना प्रभावी दिसते. परंतु संघटनेची अनेक शकले पडलेली दिसतात. संघटना प्रभावी दिसते. परंतु संघटनेची अनेक शकले पडलेली दिसतात. संघटनेचे नेते राजू शेट्टी म्हणतात-'एकाचे हजार दाणे करणारा शेतकरी कुबेरालाही धन देईल इतका श्रीमंत पाहिजे. परंतु तो गरीब कसा? या प्रश्नाचा विचार करीत आम्ही यश-अपयश पचवत पुढे जात आहोत.'

कामगार आणि शहरी समूहांच्या चळवळींना उतरती कळा लागण्याच्या काळात ग्रामीण समुहांच्या ताकदीचा अविष्कार झाला. या आंदोलनाच्या दरम्यान दगडफेक जाळपोळ इ. प्रकारचा हिंसाचार झाला. पण आंदोलनाचा मुख्य भर सरकारच्या निषेध करण्यावर, सामुहिक ताकदीद्वारे सरकारची कोंडी करण्यावर आणि रस्तावर उतरूनही शांततेने चळवळ करण्यावर राहिला. सत्याग्रघसारखे कायदेशीर मार्ग वापरले गेले. हिंसेचा वापर त्यांनी जाणिवपूर्वक टाळलेला दिसतो. यामध्ये शेतकरी संघटनेचे वर्गीय हितसंबध दिसतात. असे द.ना.धनागरे यांनी म्हटले आहे.

**(The Class Characters & Politics Of The Farmers Movement In Maharashtra during 1980'** New Farmer Movements In India Ed. Tom Brass Frank Cass & Co. Ltd. England 1995)

अन्यथा ८०-९० च्या दशकात शेतकरी संघटनेमुळे राज्य व केंद्र सरकारांपुढे कितीतरी मोठा पेच उभा राहिला असता. त्यांच्या मागण्या आणि पाठीराखे पाहिले तरी शेतकरी चळवळींना हिंसक मार्ग शिल्लक नव्हता हे कळेल. शिवाय सामूहिक सहभाग मिळवण्यासाठी हिंसक मार्ग उपयोगाचा नव्हता. शेतीच्या क्षेत्रातील अंतर्गत विसंगती दूर करणं हे त्याचे उद्दिष्ट नव्हते. त्यांना अमुलाग्र बदल अपक्षित नव्हता. त्याची मुख्य मागणीही शेती आणि उद्योग या क्षेत्रांच्या परस्पर संतुलनाशी संबधीत होती.

गेल्या काही वर्षात लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. पी. साईनाथांच्या मते महाराष्ट्रात हा शेतकऱ्यांची स्मशानभूमी आहे. शेतकरी चळवळींनी यासंदर्भात ठोस कृती केलेली नाही. याला कारण म्हणजे 'एक कलमी'स्वरुपाची

आंदोलने हे आहे. तसेच शेतकरी समूहांतर्गत असणारी विषमता हे  होय. किफायतशीर भाव किंवा बीजेवर सवलत अशा सार्वत्रिक मागण्या असल्या तरी गरीब शेतकरी व श्रीमंत शेतकरी यांच्या गरजा व अपेक्षांत फरक रहातोस. या फरकाला प्रतिसाद देणं शिल्लक रहातं. त्याही पलीकडे भूमिहीन शेतमजूर आणि सिमान्त शेतकरी यांचे प्रश्न आहेत. हरितक्रांतीनंतरचा 'मध्यम' शेतकरी हा या चळवळीचा आश्रयदाता होता. असे निष्कर्षअनेक अभ्यासकांनी काढले आहेत

**1. (OmvetGail, Cane Farmers Movement [ Mah.1] Eco.& Pol. Weekly Vol15 No49 1980)**

**2. (Nadkarni M V Farmers Movement In India Allied Pub. New Delhi 1987)**

कोरडवाहु शेतकऱ्यांची संघटना, शेतमजूरांच्या संघटना, ऊस तोड कामगार संघटना, वेगवेगळ्या डाव्या पक्षांशी संलग्न असलेल्या किसानआघाड्या अशा कितीतरी शेतकरी वर्गाच्या संघटना व पक्ष देशभरात आहेत. तरीही शेतकऱ्यांचे प्रश्न अधिकाधिक बिकट होत चाललेले आहेत. जागतिकीकरणामुळे तर शेतकऱ्यांचे प्रश्न अधिकच गुंतागुंतीचे बनत आहेत. आता शेतकरी आत्महत्येचा मार्ग स्विकारत आहे. ही आत्महत्याही निषेधपर राजकीय कृती म्हणून येत नाही, तर पराभूत माणसिकतेतून घडत आहे.

या निबंधाचा विषय शेतकरी चळवळ असा आहे. त्यामुळे मराठी साहित्यासंबधी इथे विवेचन केलेले नाही. तरीही मराठी साहित्य शेतकरी जीवनाच्या या सर्व प्रंचड गुंतागुतीपासून काही अपवाद वगळता खूप दूर असल्याचे जाणवते. मराठी साहित्यिक शेतकरी चळवळींपासून दूर असल्याचे जाणवते. कवितेमध्ये शेतकऱ्यांची दुःख उमटली आहेत. सदानंद देशमुखांसारख्या काही कांदबरीकारांच्या कांदबऱ्यांमध्ये अलिकडे शेतकरी चळवळीचे तुरळक चित्रण दिसते. बारोमासमध्ये आलेली शेतकरी चळवळ शरद जोशीकृत चळवळ आहे. इतर साहित्यप्रकारांत त्याची कमतरता जाणवते. मराठी साहित्यिक शेतकरी जीवनातील सर्व गुंतागुंत व अंतर्विरोधाशी कधी जोडून घेणार? हे उघड झाल्याशिवाय मराठी साहित्याला दिव्यता प्राप्त होणार नाही. मोठे भविष्य नाही.

❖❖❖

# 'स्त्रीवादी साहित्य चळवळ'

प्रा. उर्मिला आ. पाटील
प्रा. सुजय बा. पाटील
कमला कॉलेज, कोल्हापूर

## प्रस्तावना

साधारणतः १९६० नंतरच्या काळात मराठी साहित्य क्षेत्रात अधिक वेगाने हालचाल सुरू झालेली दिसते. या कालखंडात काही वाङ्मयीन चळवळींना प्रारंभ झालेला दिसतो. प्रथम दलित साहित्य चळवळींना प्रारंभ झाला. त्यानंतर ग्रामीण, आदिवासी ख्रिस्ती साहित्य चळवळी सुरू झाल्या. या चळवळी पाठोपाठ आता स्त्रीवादी साहित्य चळवळीची भाषा सुरू झाली. या साहित्य चळवळी जीवनाशी अधिक निगडीत आहेत. १९६० नंतरच्या साहित्य चळवळींचे वैशिष्ट्य म्हणजे त्या जीवनाच्या परिवर्तनाची मागणी करतात. 'मजल्याप्रमाणे उभी असणारी विषमव्यवस्था नष्ट झाली पाहिजे.' असे दलित चळवळींना वाटते. 'सर्वप्रकारच्या शोषणातून ग्रामीण समाज मुक्त झाला पाहिजे' असे ग्रामीण चळवळीला वाटते. 'युगायुगाच्या पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या जोखडातून स्त्रीची मुक्ती झाली पाहिजे' असे स्त्रीवादी चळवळीला वाटते. १९६० नंतरच हे का घडले ? देशात शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार ज्या क्रमाने झाला. त्या क्रमाने समाजात जागृती निर्माण झाली आणि माणसांना अभिव्यक्ती करावी असे वाटू लागले. माणसांची जाणीव जागृती शिक्षणामुळे विकसित झाली.

## स्त्रीवादी साहित्य चळवळ

पुरुषकेंद्री समाजव्यवस्थेमध्ये स्त्रीचे स्थान कायम परिघावरचे आणि दुय्यम दर्जाचे राहिले. समाजाने तिला वेगवेगळ्या रूपांमध्ये उभे करून तिचे मनुष्यत्त्व नाकारले. समाजातील तिचे दुय्यम स्थान सतत तिच्या मनावर ठसविण्यात आले. पुरुषीडावपेचांनी तिला स्वतःचे स्थान गवसू दिले गेले नाही. तसेच शिक्षण आणि स्वातंत्र्यापासून तिला दूर ठेवले. याचा परिणाम म्हणून स्त्री परंपरेने मिळालेले जीवन मुकाट्याने जगत राहिली. स्त्री निसर्गतः नाजूक, कमजोर, लाजरी, मर्यादशील, नम्र वगैरे असते. या स्त्रीविषयीच्या कल्पना परंपरेने स्त्रीनेही मान्य केल्या आहेत. स्त्रियांनाही स्व-त्वाची जाणीव नसल्याने स्त्रीत्वाविषयीच्या समाजाच्या कल्पनांना आणि सामाजिक, सांस्कृतिक अपेक्षांना एक प्रकारे सर्व मान्यता मिळाली होती. परंतु १९७५ नंतर पुढे आलेल्या स्त्रीवादी विचारप्रणालीने या पारंपरिक मतांना छेद दिला.

निसर्गतः प्रत्येक प्राणी नर किंवा मादी असतो. परंतु मानवासंदर्भातील स्त्री आणि पुरुष या संकल्पना मात्र समाजनिर्मित आहेत. तरीही त्या नैसर्गिक ठरवून समाजामध्ये चांगल्या रुजविल्या आहेत. हे पुरुषप्रधान समाजाने स्त्रीच्या माथी मारले आहे. स्त्रीची समाजातील भूमिका ठरविण्याचा अधिकार स्त्रीकडे नाही. तो पुरुषांनी स्वतःकडे ठेवलेला आहे. तिने काय

करावे, काय करू नये, कसे राहावे हे सर्व समाज ठरवितो. एवढेच नव्हे तर ज्या घरासाठी स्त्री कष्ट करते त्या घरावर, घरातील प्रत्येक वस्तूवर आणि त्या स्त्रीवरही पुरुषांची मालकी असते. स्त्रीही स्वतंत्र व्यक्ती आहे. ती मालकी हक्काची वस्तू नाही. पण समाजाने नीतिनियमांची एक बंदिस्त चौकट तिच्या सभोवती तयार केली आहे. ही चौकट स्त्रियांनीही स्वीकारलेली आहे. या बंदिस्त चौकटीतून स्त्रीला बाहेर काढणे, समाजातील दुय्यमस्थानाचा प्रतिवाद करणे, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, तसेच आर्थिक सत्तास्थानात पुरुषांच्या बरोबरीचे स्थान प्राप्त करून देणे आणि त्यासाठी आवश्यक असे डावपेच आखणे, हे स्त्रीवादी चळवळीचे ध्येय आहे.

स्त्रीवाद ही सामाजिक तसेच राजकीय प्रक्रिया आहे. स्त्रीवादाचा हेतूच मुळी स्त्रीला समान दर्जा मिळवून देणे हा आहे. पुरुषप्रधान समाज रचनेत पुरुषाला जसे अर्थपूर्ण स्थान आहे तसे स्थान स्त्रीला प्राप्त व्हावे म्हणून जीवनाच्या सर्वच क्षेत्रात संघर्ष करणारा वाद म्हणजे 'स्त्रीवाद' होय.

पश्चात जगात स्त्रीवादी चळवळ सतराव्या शतकापासून सुरू झाली. तिला ठोस रूप येण्यासाठी विसावे शतक उगवावे लागले. मतदानाचा हक्क, शिक्षण, नोकरी, व्यवसायात स्थान मिळविण्यासाठी स्त्रियांना दीर्घकाळ संघर्ष करावा लागला. या स्त्रीमुक्ती चळवळीतून पुढे स्त्रीवादी विचारांचा जन्म झाला. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातील वेगवेगळ्या प्रवाहांचा विचार करताना पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रीची घुसमट कशी होते हे समाजासमोर आणण्यासाठी इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स या देशातील स्त्रियांनी मोर्चे, निवेदने, संघटना, चर्चासत्रे, कार्यशाळा, भाषण, लेखन याद्वारे स्त्रीवादी दृष्टीने कार्य करताना समाजात स्त्री व पुरुष या भूमिका निर्माण केल्या गेल्या, हे दाखवून दिले. फ्रान्सच्या 'मेरीकुलस्टोन क्राफ्ट'ने 'द व्हिंडीकेशन ऑफ विमेन' हे स्त्रियांच्या हक्काचे समर्थन करणारे पुस्तक १७९२ मध्ये लिहिले. या पुस्तकातील विचार म्हणजे स्त्रीवादी विचारांच्या इतिहासाचा आरंभ आहे, असे म्हणता येईल. पाश्चात विचारवंत लेखिकांनी आपल्या साहित्यातून स्त्रीवादी विचारांची भक्कम मांडणी केली आहे. यामध्ये सर्वांत महत्त्वाची वैचारिक भूमिका सिमॉन-द-बोव्हांनी मांडली. स्त्री संदर्भातील इतिहास हा पूर्वग्रह दूषित आहे. आदिकाळापासून आज अखेर स्त्री बौद्धिक, वैचारिक, मानसिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक बाबतीत बंदिस्त राहिली आहे. स्त्री ही समाज व्यवस्थेकडून घडविली गेली आणि घडविणाऱ्याच्या कल्पनेनुसार, सोईनुसार आणि गरजेनुसार ती घडविली गेली. म्हणूनच त्यांनी स्त्रीला आत्मजाणीव करून घेण्याचे आव्हान केले आहे.

वेदकाळात स्त्रीचा दर्जा पुरुषांच्या बरोबरीचा होता. स्त्रीला प्रत्येक क्षेत्रात समान संधी होती. मध्ययुगात स्त्री अधिकाधिक सामाजिक, धार्मिक बंधनात जखडली गेली. पतीचे घर तिचे आश्रयस्थान झाले. ती पतीच्या घरची हक्काची दासी झाली. स्त्री शिक्षणाला बंदी, क्षेत्रशुद्धी, बालविवाह, जरठ विवाह, बहुपत्नीकत्व, नियोग पद्धती, पडदा पद्धती, सतीची चाल, पुनर्विवाहास विरोध अशी वेगवेगळ्या प्रथांमुळे स्त्रीजीवन कष्टमय झाले. स्त्रीचे शोषण हे दैवनिर्मित आहे तिने ते विनातक्रार कर्मभोग म्हणून स्वीकारायचे अशी समजूत होती.

गौतम बुद्ध, महानुभाव पंथाचे प्रवर्तक चक्रधर स्वामी यांनी जातिभेद आणि लिंगभेद वगळून स्त्रियांना पंथदिक्षा दिल्या आणि स्त्रीला 'मानव' म्हणून मान्यता दिली. ही अपवादात्मक उदाहरणे आहेत.

अव्वल इंग्रजी काळापर्यंत स्त्रियांची स्थिती अशीच होती. नंतरच्या काळात सुधारकांनी विधवा पुनर्विवाह, सतीची चाल, संमतीशिवाय विवाह या स्त्रीविषयक प्रश्नांवर दीर्घकाल लढा दिला. सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी ब्रिटिश सरकारला कायदे करावे लागले. स्त्रीशिक्षणावर भर देण्यास एकोणिसावे शतक उजाडावे लागले. सुधारणावादी चळवळीतून भारतीय स्त्री चळवळीचा उदय झाला. त्यामुळे स्त्री भोवतीच्या अनेक चौकटी खिळखिळ्या झाल्या.

१९ व्या शतकात बंगालमध्ये ब्राह्मी समाज, मद्रासमध्ये त्रिऔसौफिकळ सोसायटी, उत्तरेकडे आर्य समाज, मुंबईत प्रार्थना समाज या संघटनांनी स्त्री शिक्षणाचे कार्य हाती घेतले होते. तसेच विविध संस्था, संघटना, जातीय, वर्गीय संस्थांनी स्त्रियांचे प्रश्न हाती घेऊन स्त्री सुधारणेचा प्रयत्न केलेला होता.

## समारोप

एकूणच स्त्रिया निर्भय होऊन घराबाहेर सार्वजनिक जीवनात योगदान द्यायला पुढे आल्या. निर्भय बनलेल्या स्त्रियांनी जुनी परंपरा मोडली. अबला गणल्या जाणाऱ्या स्त्रियांमध्ये असणाऱ्या आत्मशक्तीचे प्रदर्शन घडविले. स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रिया सर्वच क्षेत्रात चमकू लागल्या आहेत. पण या सर्व विकासाचे चित्र एका बाजूला आपल्या डोळ्यासमोर असतानाच दुसऱ्या बाजूला असे दिसून येते, की या विकासाबरोबरच लिंगभेदावर आधारित शोषण मात्र कमी झालेले दिसत नाही.

❖❖❖

विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली पुरस्कृत दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

# 'मराठी वाङ्मयीन चळवळी : बदलते संदर्भ'

## गुरूवार दि. २३ व २४ डिसेंबर २०१०

## आयोजन समिती

**प्रा. सुजय बा. पाटील**
समन्वयक

**प्रा. ए. एम. साळोखे**
आयोजन समिती प्रमुख

**डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील**
प्राचार्य

### १. निमत्रंण पत्रिका कमिटी

प्रा. ए. एम. साळोखे (चेअरमन)

प्रा. डॉ. जे. बी.पाटील

प्रा. रेखा पंडित

प्रा. ए. एस. घस्ते

श्री. पी.जी. रंगापुरे. श्री. एस. ए. बरगाले

### २. बॅनर, फोटो, प्रसिध्दी बॅजस

प्रा. ए. एस. घस्ते (चेअरमन)

प्रा. एस. व्ही. पुजारी

प्रा. डी. ए. पाटील

### ३. रिफ्रेशमेंट कमिटी

प्रा. टी. एस. थोरात (चेअरमन)

प्रा. डॉ. सौ. ए. व्ही. पाठक

प्रा. रेखा पंडित

प्रा. सौ. व्ही. पी. साठे

प्रा. एस. व्ही. बागल

श्री. व्ही. एम. चिमणे. श्री. जी. एन. बेटक्याळे,

श्री. डी.जी. काटकर

### ४. फाईल, फोल्डर, बॅजेस, स्टेशनरी

प्रा. एन. व्ही. पोवार (चेअरमन)

प्रा. ए. एम. साळोखे

प्रा. रेखा पंडित

श्री. संदिप गावडे. श्री. प्रताप रंगापूरे

प्रा. वाय. बी. निवळे, श्री. रवी भरमकर

श्री. जी. एस. मेथे, श्री. एम. जी. मोरे

### ५. नोंदणी कमिटी व प्रमाणपत्र वाटप

प्रा. सौ. एन. एस. धुमाळ (चेअरमन)

प्रा. एन. व्ही. पोवार

सौ. यु. आर. कदम

प्रा. डॉ. सौ. बी. व्ही. शेळके

प्रा. श्रीमती. एस. आर. साळुंखे

श्री. एम. जी. कंग्राळकर, श्री. एस. बी. शिंदे

श्री. जे. व्ही. मोटे

## ६. प्रमाणपत्र नाव लेखन व फिडबॅक कमिटी

प्रा. डॉ. व्ही. व्ही. मैंदर्गी

प्रा. एस. व्ही. बागल

प्रा. ए. एम. साळोखे

## ७. स्टेज व्यवस्था व डेकोरेशन, बुके

प्रा. एन. एस. शिरोळकर (चेअरमन)

प्रा. ए. एम. साळोखे

श्री. सी. एम. स्वामी, श्री. एस. एस. शेळके

प्री. एस. एस. सणगंर, श्री. एस. ए. बरगाले

## ८. स्वागत समिती

प्रा. सुजय पाटील (चेअरमन)

प्रा. डॉ. जे. बी. पाटील

प्रा. ए. एम. साळोखे

प्रा. एस. व्ही. बागल

प्रा. डॉ. सौ. ए. व्ही. पाठक

प्रा. रेखा. पंडित

## ९. पाहुण्यांची व्यवस्था

प्रा. ए. एम. साळोखे

प्रा. एस. व्ही. बागल

प्रा. एस. एन. कोळेकर

## १०. गोषवारा लेखन

प्रा. डॉ. जे. बी. पाटील (चेअरमन)

प्रा. एच. व्ही. पुजारी

प्रा. सौ. यु. ए. पाटील

प्रा. आर. आर. पोवार

## ११. रांगोळी व डेकोरेशन

प्रा. डॉ. सौ. बी. व्ही. शेळके(चेअरमन)

प्रा. सौ. आर. आर. पोवार

प्रा. सौ. यु. ए. पाटील

## १२. सत्र नियोजन

प्रा. रेखा पंडित (चेअरमन)

प्रा. ए. एस. घस्ते

❖❖❖

।। निर्मातुं शिव सुंदरम् ।।

**ताराराणी विद्यापीठाचे,**

## कमला कॉलेज, कोल्हापूर

**मराठी विभाग**

**विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली पुरस्कृत दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र**

# 'मराठी वाङ्मयीन चळवळी : बदलते संदर्भ'

## गुरूवार दि. २३ व २४ डिसेंबर

# कार्यक्रम पत्रिका

## उद्घाटन समारंभ

**सकाळी १०.०० ते १२.००**

| | | |
|---|---|---|
| **स्वागत व सुत्रसंचलन** | : | प्रा.श्रीमती नीता धुमाळ |
| | | प्रा. डॉ. श्रीमती अनघा पाठक |
| **अध्यक्ष** | : | प्रा.श्री.रा.कृ. कणबरकर |
| **पाहुण्यांचे स्वागतः हस्ते** | : | मा.प्राचार्य. डॉ. क्रांतीकुमार पाटील |
| **उद्घाटन-दिप प्रज्वलन** | : | मा. कुलगुरू डॉ. ना.ज. पवार |
| | | मा.डॉ. नागनाथ कोत्तापल्ले |
| | | मा.रा.कृ.कणबरकर |
| | | प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील |
| | | प्रा. सुजय देसाई |
| | | डॉ. डी.ए.देसाई |
| **पाहुण्याची ओळख** | : | प्रा. सुजय पाटील (समन्वयक राष्ट्रीय चर्चासत्र) |

| | | |
|---|---|---|
| **प्रास्ताविक** | : | प्रा. डॉ. क्रांतीकुमार पाटील |
| | | मा.डॉ. डी. ए. देसाई |
| **उद्घाटनपर भाषण** | : | मा. डॉ. ना.ज पवार |
| **बीजभाषण** | : | मा. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले |
| **अध्यक्षीय भाषण** | : | मा. रा.कृ. कणबरकर |
| **आभार** | : | प्रा. डॉ. श्रीमती नीता धुमाळ |
| | | प्रा. डॉ. श्रीमती अनघा पाठक |

## सत्र पहिले : महाराष्ट्रातील प्रबोधनाच्या चळवळी

| | | |
|---|---|---|
| **स्वागत व सुत्रसंचलन** | : | प्रा. रेखा पंडित |
| **वक्तांची ओळख** | : | प्रा. रेखा पंडित |
| | | प्रा. अनिल घस्ते |
| **वक्ते /साधनव्यक्ती** | : | मा. प्रसाद कुलकर्णी |
| | | डॉ. अच्युत माने |
| **सत्राध्यक्ष** | : | डॉ. ल. रा. नसिराबादकर |
| **सुसंवाद** | : | डॉ. संपत पार्लेकर |
| **आभार** | : | प्रा.अनिल घस्ते |

## सत्र दुसरे : साहित्य आणि चळवळ यांचा अनुबंध

| | | |
|---|---|---|
| **स्वागत व सुत्रसंचलन** | : | प्रा. अनिल घस्ते |
| **वक्तांची ओळख** | : | प्रा. रेखा पंडित |
| | | प्रा. अनिल घस्ते |
| **वक्ते /साधनव्यक्ती** | : | मा. संतोष शेणई |
| | | प्रा.गौतमीपुत्र कांबळे |
| **सत्राध्यक्ष** | : | डॉ. डी. ए. देसाई |

| | | |
|---|---|---|
| **सुसंवाद** | : | डॉ. प्रकाश कुंभार |
| **आभार** | : | प्रा.रेखा पंडित |

## सत्र तिसरे : चळवळीतील लेखक

| | | |
|---|---|---|
| **स्वागत व सुत्रसंचलन** | : | प्रा. रेखा पंडित |
| **वक्तांची ओळख** | : | प्रा. अनिल घस्ते |
| | | प्रा. रेखा पंडित |
| **वक्ते /साधनव्यक्ती** | : | मा. डॉ. रविंद्र ठाकूर |
| | | श्री. रामनाथ चव्हाण |
| | | डॉ. सुनिलकुमार लवटे |
| | | डॉ. हिमांशु स्मार्त |
| **सत्राध्यक्ष** | : | प्रा.भैरव कुंभार |
| **सुसंवाद** | : | डॉ. जे.बी. शिंदे |
| **आभार** | : | प्रा.अनिल घस्ते |

## सत्र चौथे : निबंध वाचन विविध साहित्य प्रकार व चळवळी

| | | |
|---|---|---|
| **स्वागत व सुत्रसंचलन** | : | प्रा. रेखा पंडित |
| **वक्तांची ओळख** | : | प्रा. अनिल घस्ते |
| **सत्राध्यक्ष** | : | प्राचार्य डॉ. जी.पी. माळी |
| **सुसंवाद** | : | डॉ. ब. न. तुंरबेकर |
| **निबंध वाचन** | : | सहभागी प्रध्यापकांचे निबंध वाचन |
| **आभार** | : | प्रा.अनिल घस्ते |

## सत्र पाचवे :- चळवळीचे साहित्य शास्त्र

| | | |
|---|---|---|
| **स्वागत व सुत्रसंचलन** | : | प्रा. अनिल घस्ते |
| **वक्तांची ओळख** | : | प्रा. अनिल घस्ते |
| | | प्रा. रेखा पंडित |
| **वक्ते /साधनव्यक्ती** | : | डॉ. वासुदेव सांवत |
| **सत्राध्यक्ष** | : | डॉ. विश्वनाथ शिंदे |
| **सुसंवाद** | : | डॉ. छा.या पवार |
| **आभार** | : | प्रा. रेखा पंडीत |

## सत्र सहावे :- समारोप

| | | |
|---|---|---|
| **प्रमुख पाहुणे** | : | मा. श्रीराम पोवार (संपादक दै. सकाळ, कोल्हापूर.) |
| **अध्यक्ष** | : | मा. काँ. गाविंदराव पानसरे (ज्येष्ठ विचारवंत) |
| **प्रमुख उपस्थिती** | : | प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील |
| | | (सचिव ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर) |
| **पाहुण्यांची ओळख** | : | प्रा. सुजय पाटील (समन्वयक) |
| **सूत्र संचालन** | : | प्रा. डॉ. श्रीमती वर्षा मैंदर्गीकर |
| **आभार** | : | प्रा. नेताजी पवार |

❖❖❖

ताराराणी विद्यापीठाचे,

कमला कॉलेज, कोल्हापूर

मराठी विभाग

विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली पुरस्कृत

# दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

(गुरूवार दि. २३ व शुक्रवार दि. २४ डिसेंबर, २०१०)

# 'मराठी वाङ्‌मयीन चळवळी : बदलते संदर्भ'

## चर्चासत्राविषयी प्रतिक्रिया

सहभागी प्राध्यापकाचे नांव : ..........................................................................

..........................................................................

महाविद्यालाचे नांव : ..........................................................................

..........................................................................

चर्चासत्राविषयी प्रतिक्रिया : ..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

सूचना : ..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

सही

।। निर्मातुं शिवं सुंदरम् ।।

ताराराणी विद्यापीठाचे,

# कमला कॉलेज, कोल्हापूर (महाराष्ट्र)

## मराठी विभाग

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली पुरस्कृत

दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

## 'मराठी वाङ्मयीन चळवळी : बदलते संदर्भ'

# प्रमाणपत्र

प्रा. डॉ. श्री./श्रीमती ........................................................................ यांनी कमला कॉलेज कोल्हापूर, मार्फत शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यांच्या बौध्दीक सहयोगाने गुरूवार दि. २३ व शुक्रवार दि. २४ डिसेंबर, २०१० रोजी आयोजित केलेल्या **'मराठी वाङ्मयीन चळवळी : बदलते संदर्भ '** या विषयावरील दोन दिवसीय **राष्ट्रीय चर्चासत्रात** साधन व्यक्ती / सत्राध्यक्ष/निबंधवाचक / सहभागी शिक्षक म्हणून सक्रीय सहभाग घेतला त्याबद्दल त्यांना हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

**प्रा. सुजय बा. पाटील**
समन्वयक
राष्ट्रीय चर्चासत्र २०१०

**डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील**
प्राचार्य
कमला कॉलेज, कोल्हापूर

# कोल्हापूर शहर : एक दृष्टिक्षेप





श्री महालक्ष्मीच्या पावन अस्तित्वाने पुनित महालक्ष्मी मंदिर तसेच जोतिबा मंदिर हे भारतीय इतिहास, संस्कृती आणि धार्मिकतेचे स्मरण करून देतात. दक्षिण काशी म्हणून मान्यता पावलेल्या सुप्रसिद्ध कोल्हापूरच्या सांस्कृतिक जडण घडणीमध्ये संस्मरणीय योगदान दिलेल्या महाराणी ताराराणी, श्री छत्रपती शाहू महाराज इ. सारख्या पूजनीय ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वामुळे या शहराची ख्याती सर्वदूर पसरलेली आहे. ऐतिहासिक किल्ले पन्हाळा, न्यू पॅलेस आणि जुन्या राजवाड्यांसारखी शाही निवासस्थाने, खासबाग कुस्तीचे मैदान, नयनरम्य रंकाळा तलाव इ. स्थळांच्यामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडलेली आहे. सांस्कृतिक आणि ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या कोल्हापूरची शैक्षणिक परंपराही तितकीच वैभवशाली आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने कार्यरत असणाऱ्या शिवाजी विद्यापीठाचे देदीप्यमान यश सर्वश्रुत आहे. कोल्हापूर शहर विमानतळ, राष्ट्रीय महामार्ग, मध्यवर्ती एस. टी. सेवा यांसारख्या दळणवळणांच्या सोयींनी देशाला जोडलेले आहे.













ताराराणी विद्यापीठाचे

# कमला कॉलेज, कोल्हापूर

## संस्थापक व अध्यक्ष : कै. डॉ. श्री. व्ही. टी. पाटील

## (नॅक मानांकित B +)




**ठळक वैशिष्ट्ये**

- विद्यार्थिनीच्या विकासासाठी अनुकूल व पोषक असे संपूर्णतः सुरक्षित वातावरण.
- अभ्यासाबरोबरच ललित कला, क्रीडा, वाङ्मय इ. क्षेत्रातील गुणांना प्रोत्साहन.
- ताराराणी विद्यापीठ स्कॉलरशीप फंडातून प्रत्येक वर्गात सर्वप्रथम येणाऱ्या व इतर क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविलेल्या विद्यार्थिनींना पारितोषिके.
- एच.एस.सी. व शिवाजी विद्यापीठ परीक्षेतील उज्ज्वल यशाची परंपरा.
- ११ वी, १२ वी साठी माहिती व तंत्रज्ञान, गणित विषयांची सोय.
- १२ वी साठी उन्हाळी सुट्टीत इंग्रजी, अकौंटन्सी व विज्ञान विषयांचे खास वर्ग.
- १२ वी हुशार विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र स्कॉलर बॅच व दर्जेदार मार्गदर्शनाची सोय.
- प्रथम वर्ष वाणिज्य विभागासाठी गणित विषयाची विशेष सोय.
- बी.सी.ए. (बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन) या नवीन पदवी अभ्यासक्रमाची सोय.
- **एम. ए. होमसायन्स या नवीन पदवी अभ्यासक्रमाची सोय.**
- बी.ए. भाग-३ साठी इंग्रजी, अर्थशास्त्र, गृहशास्त्र, समाजशास्त्र व हिंदी, बी.कॉम. भाग-३ साठी ॲडव्हान्स अकौंटिंग अँड ऑडिटिंग व इंडस्ट्रियल मॅनेजमेंट या विषयांची सोय. कॉमर्स शाखेतील ज्युनियर व सिनियर वर्गांना इंग्रजी माध्यमातून शिकवण्याची सोय.
- वर्षभर अभ्यासासाठी क्रमिक पुस्तकांचा संच बुक बँकेतून देण्याची सोय.
- करिअर ओरिएंटेड स्किम अंतर्गत पुढील सर्टिफिकेट कोर्स सुरू आहेत. : डायटेटिक्स ॲन्ड हेल्थ एज्युकेशन, हॉस्पिटल ॲडमिनिस्ट्रेशन अँड मॅनेजमेंट, योगा एज्युकेशन अँड हेल्थ, ब्युटीकल्चर अँड थेरपी, कम्युनिकेशन स्किलस् इन इंग्लिश या कोर्सेसची सोय.
- अनुसुचित जाती जमातीतील विद्यार्थिनींसाठी एन्ट्री इन सर्व्हिसेस स्किम अंतर्गत स्पर्धात्मक परीक्षांचे स्वतंत्र मार्गदर्शन.
- रेमिडियल कोचिंग स्किम अंतर्गत एस.सी.एस.टी. विद्यार्थिनींसाठी अभ्यास विषयांचे स्वतंत्र मार्गदर्शन.
- 'पी.जी. डिप्लोमा इन योगा थेरपी' या अभ्यासक्रमाची सोय.
- गरीब व होतकरू विद्यार्थिनींना सर्व प्रकारचे सहाय्य.
- शिवाजी विद्यापीठ निरंतर शिक्षण योजनेअंतर्गत एरोबिक्स व ज्युदो कराटेचे अल्प मुदतीचे कोर्स.
- महिलांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी कमला हेल्थ क्लब, जिमनॅशियन हॉल, योगा हॉल व सुसज्ज वसतिगृह.
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त संगणक प्रशिक्षण केंद्राची व बी.ए., बी.कॉम. पदवी अभ्यासक्रमाची सोय.
- **'डॉ. व्ही. टी. पाटील स्मृती भवन' - सुसज्ज, प्रशस्त इमारत.**
- **अधिक माहितीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्या. - Web Add : kamalacollegekop.edu.in**